# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## महिलांच्या तक्रारींसाठी पोर्टलचे अनावरण, एका क्लिकवर नोंदवता येणार तक्रार; उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची माहिती

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- जागतिक महिला दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिर येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी महिलांची सुरक्षा, हक्क आणि आत्मनिर्भरता या विषयावर मान्यवरांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या महिला सन्मान पोर्टलचे अनावरण उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या पोर्टलच्या माध्यमातून आता महिलांना घरबसल्या एका क्लिकवर आपली तक्रार नोंदवता येणार आहे. हे पोर्टल थेट पोलिस यंत्रणेशी जोडलेले असल्याने तक्रारीची दखल तात्काळ घेतली जाईल आणि संबंधित विभागामार्फत पीडित महिलांना त्वरित न्याय मिळवून दिला जाईल, असा विश्वास सुनेत्रा पवार यांनी यावेळी व्यक्त केला. महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आपल्या भाषणात समाजातील पुरुषी मानसिकता बदलण्याची गरज अधोरेखित केली. महिलांच्या अस्तित्वाच्या लढाईत जेव्हा पुरुष बांधव खांद्याला खांदा लावून उभे राहतात, तेव्हा ही लढाई जिंकण्याचे बळ अधिक मिळते, असे त्या म्हणाल्या. तसेच, महिलांना केवळ धार्मिक पोथ्या-पुराणात न अडकवता त्यांना संविधानाची जाणीव करून देणे आवश्यक आहे. मुलीला सासरी पाठवताना तिच्या हातात संविधान द्या, जेणेकरून तिला आपल्या हक्कांची प्रबळ जाणीव होईल, असे आवाहनही त्यांनी पालकांना केले.


(वर्ष ६५ वे अंक ७२) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.०८ मार्च २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# सर्वच बँकांचे पीककर्ज होणार माफ, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

## आतापर्यंतची सर्वात चांगली कर्जमाफी असल्याचा दावा

नागपूर दि.७ (प्रतिनिधी)- ज्या बँकांना पीक कर्ज देण्याचा अधिकार आहे, त्या बँकांतून पीक कर्ज घेतलेल्या सर्वच शेतकऱ्यांना सरकारच्या २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. यामुळे सरकारच्या कर्जमाफीचा लाभ कोणकोणत्या शेतकऱ्यांना मिळणार? याविषयीची संभ्रमावस्था संपुष्टात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. त्यात त्यांनी शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करण्याची घोषणा केली. पण या कर्जमाफीचा लाभ कोणत्या बँकांकडून घेतलेल्या पीक कर्जावर मिळेल याविषयी वेगवेगळे दावे-प्रतिदावे केले जात होते. पण आता मुख्यमंत्र्यांनी स्वतः याविषयीची स्थिती स्पष्ट केली आहे. ते म्हणाले, मी शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली आहे. त्यामुळे त्याबद्दल कुणाच्याही मनात संभ्रम नाही. काही लोक वेगवेगळ्या गोष्टी पसरवण्याचा प्रयत्न करतात. कुणी म्हणतो राष्ट्रीयीकृत बँकांचे कर्ज माफ होणार नाही, कुणी म्हणतो जिल्हा बँकेचे होणार नाही, कुणी म्हणतो या सोसायटीची होणार नाही, कुणी म्हणतो त्या सोसायटीची होणार नाही.

पण सरकारने पीक कर्ज देण्याचा अधिकार असणाऱ्या कोणत्याही बँकेने दिलेले २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. केवळ आमचा प्रयत्न हा आहे की, माफी शेतकऱ्याला द्यायची आहे बँकेला नाही. त्यामुळे या निर्णयाचा फायदा शेतकऱ्याला व्हावा यासाठी काम सुरू आहे. आम्ही यापूर्वीच सांगितले आहे की, ३० जूनच्या आधी आपण कर्जमाफी करणार आहोत. त्यामुळे आता ही घोषणा बजेटमध्ये करण्यात आल्यामुळे पुढच्या कारवाईला सुरुवात होईल. ही समिती यावर काम करत आहे. ही समिती यासंबंधीच्या सगळ्या गोष्टी सांगेल. मी एवढेच सांगतो की, ही कर्जमाफी यापूर्वीच्या सर्वच कर्जमाफीच्या निर्णयांहून चांगली आहे.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्प विदर्भासाठी गेमचेंजर ठरणार असल्याचाही दावा केला. काल्याच्या अर्थसंकल्पात संपूर्ण महाराष्ट्राला भरभरून मिळाले आहे. जेव्हा महाराष्ट्राला भरभरून मिळते, तेव्हा विदर्भ कधी मागे राहील. विदर्भासाठी वैनगंगा - नळगंगा नदीजोड



प्रकल्प विदर्भासाठी गेम चेंजर ठरेल. हा प्रकल्प आतापर्यंतच्या आपल्या इतिहासातील सगळ्यात मोठा नदीजोड प्रकल्प आहे. त्याला प्रशासकीय मान्यता देऊन त्याचा आपण अर्थसंकल्पात समावेश केला आहे. त्यामुळे विदर्भाचे चित्र पूर्णपणे बदलेल, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी माध्यमांना इराण विरुद्ध इस्त्रायल - अमेरिका युद्धावर नागरिकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होईल असे चित्र निर्माण न करण्याचेही आवाहन केले. माझी माध्यमांना विनंती आहे की, नागरिकांमध्ये विनाकारण भीतीचे वातावरण करू नये. जी काही परिस्थिती आहे, ती केंद्र सरकार हाताळत आहे. ती केंद्र सरकार सांगत आहे. विनाकारण वेगवेगळ्या बातम्या दाखवून हे घडणार, ते घडणार असे सांगून नागरिकांच्या मनात भीती व संभ्रम तयार करणे हे देशाच्या व समाजाच्या नाही. केंद्र सरकारनेही काल हेच स्पष्टपणे सांगितले आहे, असे ते म्हणाले.

## नक्षल चळवळीला हादरा! १३० नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

गडचिरोली दि.७ (प्रतिनिधी)- देशातील नक्षलवाद पूर्णपणे मोडीत काढण्यासाठी केंद्र सरकारने ३१ मार्च २०२६ ची 'डेडलाइन' निश्चित केली असतानाच, तेलंगणाची राजधानी हैदराबादमध्ये नक्षली चळवळीला मोठा हादरा बसला आहे. शनिवारी एका विशेष कार्यक्रमात प्रतिबंधित नक्षलवादी संघटनेच्या १३० नक्षलवाद्यांनी मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्यासमोर शस्त्रे खाली ठेवून आत्मसमर्पण केले. यामध्ये अनेक बड्या नेत्यांचा समावेश असून, मोठ्या प्रमाणात अत्याधुनिक शस्त्रास्त्रेही पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आली आहेत. काही दिवसांपूर्वी सर्वोच्च नेता पॉलिट ब्युरो सदस्य देवजी, केंद्रीय समिती सदस्य संग्राम याच्यासह चार नेत्यांनी आत्मसमर्पण केले होते.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद पूर्णपणे समाप्त करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षा दलांची वाढती कारवाई आणि सरकारच्या प्रभावी पुनर्वसन धोरणामुळे नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडल्याचे चित्र दिसत आहे. एका बाजूला अनेक भागांत चकमकींमध्ये नक्षलवादी मारले जात असताना, दुसरीकडे मोठ्या संख्येने नक्षलवादी मुख्य प्रवाहात परतत आहेत. या सामूहिक आत्मसमर्पणाला नक्षलविरोधी मोहिमेतील ऐतिहासिक यश मानले जात आहे.

आत्मसमर्पण करणाऱ्या १३० जणांपैकी १२५ नक्षलवादी छत्तीसगडमधील आहेत, तर ४ तेलंगणा आणि १ आंध्र प्रदेशचा आहे. यामध्ये संघटनेच्या धोरण निश्चितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे ३ राज्य समिती सदस्य, १० विभागीय समिती सदस्य, ४६ एरिया कमिटी सदस्य आणि ७६ दलम सदस्यांचा समावेश आहे. आत्मसमर्पणावेळी नक्षलवाद्यांनी ३१ ए.के.-४७ रायफल्स, २१ इन्सास रायफल्स, २० एसएलआर रायफल्स आणि एक इन्सास एलएमजी रायफल यांसह मोठ्या प्रमाणात दारुगोळा प्रशासनाकडे सुपूर्द केला.

या प्रसंगी मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी आत्मसमर्पण करणाऱ्यांचे स्वागत केले. महात्मा गांधींच्या या देशात हिंसक आणि सशस्त्र मार्गाने कोणत्याही समस्येचे निराकरण होऊ शकत नाही. भरकटलेल्यांनी आता लोकशाही आणि शांततेच्या मार्गावर परतावे, असे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्र्यांनी नक्षलवाद्यांना 'बुलेट'चे राजकारण सोडून 'बॅलेट'च्या राजकारणात सहभागी होण्याचे आवाहन केले. लोकशाहीत जनतेची सेवा आणि हक्कांची लढाई लढण्याचे निवडणूक हेच सर्वात मोठे माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले.

नक्षलवादी संघटनेचा सर्वोच्च नेता गणपती यानेही हिंसेचा मार्ग सोडावा, सरकार त्याला पूर्ण सुरक्षा आणि सन्मानजनक पुनर्वसन देईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. राज्य सरकार आत्मसमर्पण करणाऱ्यांना रोजगार, शिक्षण आणि सुरक्षेसह सर्वतोपरी मदत करेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. गेल्या काही वर्षांत नक्षलग्रस्त भागात झालेली विकासकामे, रस्ते आणि आरोग्य सुविधांमुळे नक्षलवाद्यांचा जनाधार घटत चालल्याचे या मोठ्या शरणागतीवरून स्पष्ट होत आहे.

## आमचा तो हेतू नव्हता; इराणच्या अध्यक्षांनी मागितली मुस्लीम देशांची माफी

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण असे युद्ध भडकले असताना आता इराणच्या अध्यक्षांनी मोठे पाऊल उचलले आहे. आठ दिवसांपासून पश्चिम आशियातील आखाती देशांमध्ये क्षेपणास्त्र, ड्रोन हल्ल्यांचे सत्र सुरू होते. शनिवारी इराणने शेजारी असलेल्या मुस्लिम राष्ट्रांची माफी मागत क्षेपणास्त्र हल्ले थांबवत असल्याची घोषणा केली. इराणचे अध्यक्ष डॉ. मसूद पेझेश्कियान यांनी टीव्हीवर केलेल्या भाषणात म्हटले की, इराणच्या तात्पुरत्या नेतृत्व परिषदेने शेजारील देशांवरील हल्ले आणि क्षेपणास्त्र प्रक्षेपण थांबविण्याचा निर्णय घेतला आहे. जोपर्यंत इतर देशातून हल्ले होणार नाहीत, तोपर्यंत इराणही हल्ले करणार नाही.

इराणच्या नरमाईच्या भूमिकेमुळे आता या युद्धातून मार्ग निघण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आपल्या भाषणात डॉ. मसूद पेझेश्कियान म्हणाले, मी शेजारच्या देशांची माफी मागतो. इतर देशांवर आक्रमण करण्याचा (पान ४ वर)

## भारताचा उदय दुसरं कोणी ठरवू शकत नाही; भारताने अमेरिकेला ठणकावले

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- भारत आणि अमेरिकेतील बहुप्रतिक्षित व्यापार करारावर काही दिवसांपूर्वी शिक्कामोर्तब झालं. याबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही अनेकदा भाष्य केलं. एवढंच नाही तर त्यानंतर अमेरिकेने भारतावरील आयात शुल्क ५० टक्क्यांऐवजी १८ टक्के करण्याचा निर्णय घेतला. मात्र, आता भारत-अमेरिका व्यापार कराराच्या अनुषंगाने अमेरिकेचे उप परराष्ट्रमंत्री ख्रिस्तोफर लँडौ यांनी नुकतंच केलेलं एक वक्तव्य चर्चेत आलं आहे.

'भारत आणि अमेरिका व्यापार करारामध्ये अमेरिका राष्ट्रीय हीत प्रथम ठेवणार असून आम्ही २० वर्षांपूर्वी चीनशी केलेल्या चुका आता भारतासोबत होऊ देणार नाहीत', असं ख्रिस्तोफर लँडौ यांनी म्हटलं होतं. दरम्यान, ख्रिस्तोफर लँडौ यांच्या या वक्तव्याला आता भारताचे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

'भारताचा उदय दुसरं कोणी ठरवू शकत नाही. भारत स्वतःचा उदय स्वतः करेल', अशा शब्दांत भारताचे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी अमेरिकेचे उप परराष्ट्रमंत्री ख्रिस्तोफर लँडौ यांना ठणकावलं आहे. या संदर्भातील वृत्त न्यूज १८ ने दिलं आहे.

अमेरिकेचे उप परराष्ट्रमंत्री ख्रिस्तोफर लँडौ यांनी केलेल्या वक्तव्याला प्रत्युत्तर देताना मंत्री एस.जयशंकर यांनी म्हटलं की, ''जागतिक स्तरावर भारताचा उदय इतर देशांच्या चुकांमुळे नव्हे तर स्वतःच्या क्षमतेमुळे होईल. भारताचा उदय भारतच निश्चित करेल आणि तो आपल्या ताकदीने निश्चित केला जाईल, इतरांच्या चुकांनी नाही.''

''अमेरिका भारताबरोबरच्या व्यापार करारामध्ये 'अमेरिका फर्स्ट' हेच धोरण अवलंबवणार आहे. भारताबरोबर आर्थिक संबंध आणि व्यापार वाढवताना अमेरिका स्वतःच्या राष्ट्रीय हितांना प्राधान्य देईल आणि दोन दशकांपूर्वी केलेल्या चुका टाळेल. २० वर्षांपूर्वी आम्ही चीन संदर्भात केलेल्या चुका आता भारतासोबत होऊ देणार नाही. कारण अमेरिकेने तेव्हा आपल्या बाजारपेठा खुल्या केल्या होत्या आणि त्यानंतर विविध क्षेत्रांत चीनने अमेरिकेला मागे टाकलं. त्यामुळे आता अमेरिका फर्स्ट हेच धोरण आहे. डोनाल्ड ट्रम्प यांचं प्रशासन राष्ट्रीय हिताला सार्वभौम राज्यांमधील सामायिक तत्व मानतं. जसं राष्ट्राध्यक्ष ट्रम्प अमेरिकेला पुन्हा महान बनवू इच्छित आहेत. तसेच भारताचे पंतप्रधान किंवा इतर नेत्यांकडून त्यांचे देश पुन्हा महान बनवण्याची अपेक्षा करतील'', असं ख्रिस्तोफर लँडौ यांनी म्हटलं होतं.

## युद्धाचा भडका, सर्वसामान्यांना महागाईचा चटका!; घरगुती गॅस सिलेंडरच्या किंमती महागल्या

नवी दिल्ली दि.७ (वृत्तसंस्था)- अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष हा दिवसागणिक वाढताना दिसत आहे. या संघर्षामुळं मात्र प्रत्यक्ष युद्धात सहभागी नसलेल्या देशांनाही या युद्धजन्य परिस्थितीचा सामना करावा लागतोय. अशातच आता युद्धाचा जागतिक बाजारपेठेवर परिणाम होत असून जगासमोर नवं संकट निर्माण झालं आहे. त्याची झळ अगदी भारताला देखील बसू लागली आहे. अशातच आता राज्यातील घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतीत ६० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. परिणामी, महाराष्ट्रात ८६० रुपयांना मिळणारं सिलेंडर गॅस आता ९२० रुपयांना मिळणार आहे. आजपासून हे दर लागू होणार असल्याची माहिती आहे. १४.२ किलोच्या घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतीमध्ये आजपासून हि दरवाढ लागू होणार आहे.

भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा एलपीजी आयात करणारा देश आहे. गेल्या वर्षी, देशाने अंदाजे ३३.१५ दशलक्ष मेट्रिक टन स्वयंपाकाच्या गॅसचा वापर केला. (पान ४ वर)

## जागतिक तणावात भारताने संवाद व शांततेसाठी प्रयत्न करावेत; ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे पंतप्रधानांना पत्र

अहिल्यानगर दि.७ (प्रतिनिधी)- सध्या जागतिक स्तरावर सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून भारताने जागतिक स्तरावर शांतता व संवाद वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले आहे.

अमेरिका-इस्रायल व इराण यांच्यामधील सध्याच्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक हजारे यांनी पंतप्रधानांना हे पत्र आज, शनिवारी पाठवले आहे. अण्णा हजारे सध्या राळेगणसिद्धी येथे आहेत. अण्णा हजारे यांनी पंतप्रधानांना पाठवलेल्या पत्रात सध्याची जागतिक परिस्थिती अतिशय चिंताजनक असल्याचे नमूद केले आहे. विविध देशांमधील वाढता तणाव व संघर्ष यामुळे सामान्य नागरिकांचे जीवन असुरक्षित होत चालले आहे. या घटनांमधून निरपराध महिला, बालके, त्यांचे कुटुंबीय यांच्यावर होणारा परिणाम हा अतिशय दुःखदायक व वेदनादायी ठरतो असल्याकडे लक्ष वेधले आहे.

भारताची संस्कृती ही अहिंसा व शांततेची आहे. आपल्या देशाने नेहमीच जागतिक परस्पर संवाद व शांतता याचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. भारतासारख्या मोठ्या लोकशाहीवादी देशाने मानवता व शांततेचा संदेश देणे अत्यंत आवश्यक असल्याचे हजारे यांनी पत्रात नमूद केले आहे. आज जगातील देशांना शस्त्रास्त्रे नव्हे तर परस्पर विश्वास व संवाद आवश्यक आहे. युद्धातून केवळ विनाश होतो, परंतु संवादातून समाधान व स्थिरता याचा मार्ग दाखवला जातो. माझी आपल्याला विनंती आहे (पान ४ वर)


## विदर्भात उष्णतेची लाट येण्याची शक्यता; वर्धा, अकोला, अमरावतीला हवामान विभागाचा सतर्कतेचा इशारा

नागपूर दि.७ (प्रतिनिधी)- विदर्भात तापमानात मोठी वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन भारतीय हवामान विभागाच्या प्रादेशिक हवामान केंद्र नागपूरने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार पुढील दोन दिवस विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट जाणवण्याची शक्यता आहे. विशेषतः अकोला, अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांसाठी उष्णतेच्या लाटेबाबत चेतावणी जारी करण्यात आली आहे. या काळात उन्हाची तीव्रता वाढण्याची शक्यता असून नागरिकांनी स्वतःची आणि कुटुंबीयांची काळजी घेण्याचे आवाहन हवामान विभागाने केले आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार विदर्भातील इतर भागांमध्येही कमाल तापमान सामान्यापेक्षा सुमारे तीन ते चार अंश सेल्सिअसने अधिक राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे उष्णतेचा त्रास वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. उन्हाळ्याच्या या काळात शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे, थकवा येणे किंवा उष्माघाताचा (पान ४ वर)

## प्रसिद्ध आयुर्वेदिक डॉक्टर मनीषा जेजुरकर यांची आत्महत्या; नाशिकमध्ये धक्कादायक घटना

नाशिक दि.७ (प्रतिनिधी)- नाशिक शहरातील वैद्यकीय क्षेत्राला हादरवून टाकणारी एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. शहरातील परिचित आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ. मनीषा जेजुरकर यांनी राहत्या घरी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे संपूर्ण नाशिकमध्ये हळहळ व्यक्त होत असून वैद्यकीय क्षेत्रात शोककळा पसरली आहे.



शहरातील गंगापूर रोड परिसरात त्या वास्तव्यास होत्या. त्यांच्या निधनाची माहिती समोर आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबीयांसह ओळखीच्या व्यक्तींना मोठा धक्का बसला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी त्यांच्या राहत्या घरी ही घटना घडली. घरात त्यांचा मृतदेह आढळून आल्यानंतर ही बाब समोर आली. घटनेची माहिती मिळताच गंगापूर पोलिस ठाण्याचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे. या घटनेनंतर परिसरातील नागरिक आणि परिचितांमध्ये मोठी चर्चा सुरू झाली आहे. पोलिसांनी प्राथमिक तपास सुरू करत घटनेबाबत अधिक माहिती गोळा करण्याचे काम हाती घेतले आहे.

डॉ. मनीषा जेजुरकर या आयुर्वेदिक वैद्यकीय क्षेत्रात परिचित नाव मानल्या जात होत्या. अनेक वर्षे त्यांनी रुग्णसेवा करत वैद्यकीय क्षेत्रात आपली (पान ४ वर)

## आपण संसदेत आवाज उठवावा, अजित पवारांच्या अपघात चौकशीबाबत रोहित पवार दिल्लीत; अरविंद केजरीवालांशी चर्चा

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादीचे नेते तथा दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाताची सखोल चौकशी करावी, तसेच डीजीसीएच्या अहवालावर प्रश्न उपस्थित करत आमदार रोहित पवार यांनी महाराष्ट्र विधानसभेनंतर आता दिल्लीच्या संसदेतही या प्रश्नावर आवाज उठवण्यासाठी विविध नेत्यांची भेट घेतली आहे. आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंह यांनी राज्यसभेत अजित पवारांच्या अपघाताचा मुद्दा उपस्थित करावा, अशी मागणी रोहित पवार यांनी दिल्लीत त्यांची भेट घेऊन केली. संसदेत जे सामान्यांचा आवाज उठवतात आणि मनापासून लोकांच्या हितासाठी लढतात त्या खासदारांच्या भेटून आम्ही अजित पवार अपघाताची माहिती देतोय. मराठी माणसाला न्याय दिला जात नाही, व्हीएसआर कंपनीविरुद्ध एफआयआर होत नाही. यासंदर्भातील मुद्दा संसदेत उचलावा, अशी मागणी आपण केल्याचं रोहित पवार यांनी म्हटलं.

केंद्रीयमंत्री असलेल्या टीडीपीच्या नेत्यांचे व्हीएसआर कंपनीच्या मालकांसोबत चांगले संबंध आहेत. त्यामुळे, टीडीपी नेत्यांना मंत्रिमंडळात ठेवणं योग्य नाही. ११ एबजी १२ रूल अंतर्गत तपास करावा. तसेच, डीजीसीएमध्ये मोठे बदल व्हावेत अशी आमची इच्छा आहे, असेही रोहित पवार यांनी संजय सिंह यांच्या भेटीनंतर बोलताना म्हटले.

## भारताला परवानगी देणारी अमेरिका कोण?, पीएम मोदी अमेरिकेच्या तालावर का नाचताहेत?, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांचा घणाघात

मुंबई दि.७ (प्रतिनिधी)- अमेरिकेने इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताला रशियाकडून पुढील ३० तेल खरेदी करण्याची मुभा दिली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अमेरिकेच्या या निर्णयावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्रीत रालोआ सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. भारताला परवानगी देणारी अमेरिका कोण? भारताचे पंतप्रधान अमेरिकेच्या तालावर का नाचत आहेत? असा संतप्त सवाल यांनी त्या प्रकरणी केला आहे.

अमेरिकेच्या वित्त विभागाने (ट्रेझरी डिपार्टमेंट) भारतीय रिफायनरींना रशियन तेल खरेदी करण्यासाठी ३० दिवसांची परवानगी दिली आहे. ही मुदत ४ एप्रिल २०२६ रोजी संपुष्टात येणार आहे. इराण विरुद्ध इस्त्रायल - अमेरिका युद्धामुळे जागतिक तेल पुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अमेरिकेने ही कथित सवलत दिली आहे. पण अमेरिकेची ही सवलत केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारसाठी चांगलीच डोकेदुखी ठरली आहे. विरोधी पक्षांनी या प्रकरणी मोदींवर शरसंधान साधत भारताचे सार्वभौमत्व अमेरिकेकडे गहाण टाकल्याचा आरोप केला आहे. या पार्श्वभूमीवर हर्षवर्धन सपकाळ यांनीही मोदींवर तोंडसुख घेतले आहे.

हर्षवर्धन सपकाळ शनिवारी सकाळी एका पोस्टद्वारे म्हणाले, भारताला परवानगी देणारा अमेरिका कोण? हा भारताच्या सार्वभौमत्वाचा अपमान, आपल्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणातील फोलपणा नाही का? भारताचे पंतप्रधान अमेरिकेच्या तालावर का नाचताहेत? पंतप्रधान नरेंद्र मोदी एपस्टिन फाईल मुळे अमेरिकेसमोर कॉम्प्रमाईज्ड होऊन भारत देशाचा अपमान करत आहेत.

हर्षवर्धन सपकाळ यांनी शुक्रवारीही या प्रकरणी सरकारवर निशाणा साधला होता. त्यात त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर व पीएम मोदींचा एक फोटो पोस्ट करत सरकारवर उपरोधिक टीका केली होती. सपकाळ यांनी शेअर केलेल्या फोटोत मोदींच्या पाठीवर तडजोड करणारा अशी पट्टी लावली आहे. त्याच्या हातात अमेरिकेच्या परवानगीचा एक कागदही दिसत आहे. त्यावर शाब्बास... तुम्ही परंपरा जपली, असे सावरकर मोदींना म्हणताना छायाचित्रात दिसून येत आहे. हर्षवर्धन सपकाळ यांची ही पोस्ट सध्या सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल होत आहे.

## आम्हाला युद्धात ओढण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला?, यूएईच्या उद्योगपतीचा संताप

अबूधाबी दि.७ (वृत्तसंस्था)- अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील युद्ध अद्यापही सुरूच असून यामध्ये इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे इराण आक्रमक पद्धतीने अमेरिका-इस्रायलवर प्रतिहल्ले करत आहे. यामध्ये इराणने यूएईच्या दुबई आणि अबू धाबीसह अनेक शहरात हवाई हल्ले केले. त्यामुळे हे युद्ध आणखी भडकण्याची शक्यता वर्तवली जाते. असं असतानाच यूएईमधील एका उद्योगपतीने अमेरिकेवर संताप व्यक्त केला आहे. 'आम्हाला युद्धात ओढण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला?', असं म्हणत यूएईमधील अब्जाधीश उद्योगपती खलफ अहमद अल हब्तूर यांनी अमेरिकेवर संताप व्यक्त केला. तसेच याबाबत डोनाल्ड ट्रम्प यांना पत्र लिहून काही सवाल विचारले आहेत. दरम्यान, उद्योगपती खलफ अहमद अल हब्तूर यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना खुलं पत्र लिहित इराणबरोबर अमेरिकेच्या सुरू असलेल्या लष्करी संघर्षात आखाती आणि मध्य पूर्वेतील देशांना ओढण्याच्या त्यांच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ''तुम्ही आखाती देशांना आणि अरब देशांना अशा धोक्याच्या केंद्रस्थानी आणून ठेवलं आहे, जे त्यांनी कधीही निवडलं नव्हतं. देवाचे आभार, आम्ही स्वतःचं रक्षण करण्यास सक्षम आहोत. आमच्याकडे आमच्या मातृभूमीचं रक्षण करणारे सैन्य आणि संरक्षण आहे. मात्र, प्रश्न हा आहे की, आम्हाला युद्धात ओढण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला?'', असा सवाल उद्योगपती खलफ अहमद अल हब्तूर यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना केला.

# महिला सशक्तीकरण

आठ मार्च जागतिक महिला दिन. महिला सशक्तीकरण दिवस. आम्ही सशक्त तर आधीपासूनच होतो. आमची शक्ती, आमचे शौर्य, बुद्धी यांची प्रचीती देवांपासून सर्वांनाच होती. पुराणामध्येही स्त्री शक्तीला वंदन केले आहेच. स्त्री ही अनादीकाळापासून शक्ती स्वरूपात आहे. बदल त्या परिस्थितीत त्याची परिभाषा जरूर बदलली आहे. राक्षसांचा संहार असो वा आणखी कोणते कठीण काम स्त्री सर्वदाच अग्रणी आहे. म्हणून महिला सशक्तीकरण हे आधुनिक नसून पौराणिकच आहे.

आमचा विकास तर झालाच आहे. पण सर्वांगीण नाही. समाजाचा काही वर्ग खूप पुढे निघून गेला आहे. परंतु, काही वर्ग मागेच आहे. त्याचा विकास झाला नाही.

बदलत्या परिस्थितीत मात्र स्त्रीची भूमिका बदलली आहे. ती मुलगी, सून, पत्नी, माता ह्या भूमिकांव्यतिरिक्त अधिकारी, वैज्ञानिक, शिक्षक, कर्मचारी, मालक, अशा अनेक रूपांनी आहे. तिच्या जीवनाला अनेक पैलू लाभले आहेत. आणि त्यांना अधिक चमक तिने आपल्या कर्तृत्वाने दिली आहे. आपल्या बुद्धीला, आत्मसन्मानाला तिने नवीन दिशा दिली आहे. आजच्या जगात असे कोणतेही क्षेत्र नाही जिथे स्त्री नाही. प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या पुढे आहे. ह्या सर्व गोष्टींचा वेचार केला तर असे वाटते की आम्हाला आमची जागा मिळाली आहे. पण माझ्या मते अजून आम्हाला बरेच प्रयत्न करायचे आहेत.

आमचा विकास तर झालाच आहे. पण सर्वांगीण नाही. समाजाचा काही वर्ग खूप पुढे निघून गेला आहे. परंतु, काही वर्ग मागेच आहे. त्याचा विकास झाला नाही. अजूनही अनेक स्त्रिया अशिक्षित, अंधश्रद्धा, पतीची मारहाण, हुंडा अशा अनेक गोष्टींच्या बंधनात अडकलेल्या आहे. त्यांना परिवर्तनाची दिशा मिळालीच नाहीये. त्यांचा दिवस कोंबडं आरवण्याच्या आधी सुरू होतो आणि रात्रीच्या किरकिर होता संपतो. अजूनही त्या दोन वेळेची भूक भागवण्यासाठी 'ठेविले अनंते तैसिची राहावे' असे म्हणत नवऱ्याची मारहाण सहन करण्यात अख्खं आयुष्य घालवत असतात. पण या आरशाची एक बाजू फारच सुंदर आहे तर दुसरी तेवढीच कुरूप.

ह्या दिवशी दहा मिनिटं थांबून जर विचार केला तर आपल्याला आत्मग्लानीच होईल, की आपण फक्त आपलाच विचार केला आहे. दुसऱ्याच्या नाही. आणि याची परिभाषा विकास आहे. तर तो फक्त स्वःविकासच आहे. आज आमच्यापैकी अनेक महिला डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षिका, नेता, अभिनेत्री, मंत्री, देशाच्या सर्वोच्च पदांवरदेखील आहेत. त्याचवेळी दुसरीकडे गावात अनेक स्त्रिया मुलांना जन्म देताना मरतात, हुंड्याच्या अभावी जळतात पण त्यांना न्याय मिळत नाही. त्यांची बातमीही वर्तमानपत्रात झळकत नाही. त्यांच्या अधिकारांसाठी आंदोलन होत नाही. असे का? जर आपण सर्वांगीण विकासाच्या गोष्टी करतो, तर ह्या स्त्रियांचा विकास ही आपली जबाबदारी नाही का? आत्मविश्लेषण केल्यास ही जबाबदारी आपली आहे, याची जाणीवही आपल्याला होईल. त्यांच्या मागासण्याचं कारण आम्ही काही अंशी आहोतच.

ह्या प्रश्नांना सोडविण्यासाठी आंदोलनाचं रूप द्यावंच लागेल. आपल्या जीवनक्रमात एक दिवस जरी समाजासाठी द्या. जर हे प्रश्न आज सोडवू शकलो नाही तर हे असेच कायम राहतील. अनेक मुले अनाथ होतील. काही तर जन्मच घेणार नाहीत. अनेक स्त्रियांचे अश्रू असेच वाहत राहतील. आपल्या सर्वांना एकच विनंती आहे की ''एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ'' या विचाराची अंमल बजावणी करून आपल्या गरजू बहिणींना आधार देऊ तरच आजचा दिवस सार्थकी लागेल.

# हिंसाचाराच्या दलदलीतून महिला व मुलींना बाहेर काढण्याला प्राधान्य द्या

कुटुंबरुपी रथाचे दोन चाक पैकी महिला हे अत्यंत महत्वाचे चाक असताना, तसेच देशांत महिलांना नदीची उपमा दिलेली असताना व भारतातील राजा-महाराजांनी स्त्रीदाक्षिण्यची परंपरा राखलेली असतांना आज देशात सर्वत्र महिला - मुलींवर अनन्य अत्याचार,अन्याय व व्यभिचार घटना घडत आहेत ही भारतासारख्या देशाला अत्यंत लाजिरवाणी बाब आहे.नराधम, विकृत मनोवृत्ती, व लिंग पिसाटच नव्हे तर सधन, उच्चभ्रू ही महिलांवर अन्याय ,अत्याचार करून महिलेबाबत अनादर दाखवत महिला व मुलींच्या जीवनाशी खेळून त्यांचे जीवन उध्वस्त करीत आहेत ही अत्यन्त लांसनास्पद बाब आहे.महिलासाठी चे कायदे फक्त कागदावरच आहेत. आज मुलीच्या जन्माबाबत उदासीनता आहे.ती जन्मण्याआधीच तिला गर्भातच मारल्या जात आहे. गर्भनिदान चाचण्याबाबद कायदा फक्त कागदावरच आहे. सरकारी व खाजगी कार्यालय व कंपन्यात महिलांवर अन्याय व अत्याचार वाढलेले आहेत.लैंगिक अपराधापासून बाल संरक्षण कायदा (पोस्को)२०१२ हा सुद्धा कायदा कागदावरच आहे.बालवयातील अत्याचार वाढत आहेत व ते वाढतच आहेत. बालवयातील अत्याचारांनी उच्च सीमा गाठली आहे. हुंडाबळी कायदा असून नसल्यासारखाआहे.स्त्री भ्रूण हत्या वाढत आहे. कौटुंबिक हिंसाचारपासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ ही कागदावर आहे हे सर्व कायदे असले तरी आजच्या महिला व मुली सुरक्षित नाहीत.वाढत्या सर्व प्रकारच्या दलडाळीतून महिलां-व मुलींना बाहेर काढण्यासाठी आणखी कठोरात कठोर कायदे करण्याची नितांत गरज आहे.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# नारीशक्तीचा जागतिक प्रवास : समतेच्या स्वप्नाकडून सशक्तीकरणाच्या वास्तवाकडे

**दरवर्षी** ८ मार्च हा दिवस संपूर्ण जगभर 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून साजरा केला जातो. हा केवळ उत्सवाचा दिवस नाही, तर स्त्रीच्या संघर्षांचा, कर्तृत्वाचा, स्वाभिमानाचा आणि समतेच्या आकांक्षेचा इतिहास पुन्हा एकदा स्मरणात आणणारा आणि भविष्याच्या दिशेने नवी प्रेरणा देणारा दिवस आहे. १९व्या शतकाच्या अखेरीस आणि २० व्या शतकाच्या प्रारंभी औद्योगिक क्रांतीनंतर स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठू लागला. कामगार चळवळींमध्ये स्त्रियांनी समान वेतन, सुरक्षित कामाचे तास आणि मतदानाचा अधिकार यांसाठी संघर्ष सुरू केला. या संघर्षाचे संघटित रूप १९०८ मध्ये अमेरिकेत पाहायला मिळाले. पुढे १९१० मध्ये कोपनहेगन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत जर्मन समाजवादी नेत्या क्लारा झेटकिन यांनी महिला दिन साजरा करण्याची कल्पना मांडली. १९११ पासून काही देशांत हा दिवस साजरा होऊ लागला आणि १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने अधिकृत मान्यता दिल्यानंतर त्याला जागतिक स्वरूप प्राप्त झाले. अशा ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आजचा महिला दिन हा स्त्रीसमानतेच्या दीर्घ आणि खडतर प्रवासाचा प्रतीकात्मक टप्पा आहे.



भारतीय समाजरचनेत स्त्रीची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. प्राचीन काळात स्त्री ला देवी समान मानले गेले असले, तरी व्यवहारात स्त्रीला अनेक मर्यादा आणि बंधनांचा सामना करावा लागला. मध्ययुगीन काळात सामाजिक रूढी परंपरांनी स्त्रीच्या शिक्षणावर, स्वातंत्र्यावर आणि सहभागावर बंधने आणली गेली होती. तथापि, १९व्या शतकात समाजसुधारकांच्या चळवळींनी या परिस्थितीत परिवर्तन घडवून आणण्यास सुरुवात केली. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली; राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथेच्या उच्चाटनासाठी लढा दिला; पंडिता रमाबाई यांनी विधवाशिक्षणाचा प्रसार केला. या सुधारकांच्या प्रयत्नांमुळे स्त्रीसमानतेचा पाया घातला गेला. स्वातंत्र्यलढ्यातही स्त्रियांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी, अरुणा आसफ अली यांसारख्या अनेक महिलांनी नेतृत्व, त्याग आणि धैर्याचे उदाहरण घालून दिले.

स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट उच्चार केला. भारतीय राज्यघटनेमधील कलम १४, १५ आणि १६ यांनी कायद्यापुढे समानता, लिंगाच्या आधारावर भेदभावास मनाई आणि समान संधीची हमी दिली. यामुळे स्त्रीच्या अधिकारांना संवैधानिक आधार मिळाला आहे. पुढील काळात स्त्रियांच्या संरक्षणासाठी आणि सशक्तीकरणासाठी अनेक कायदे व योजना राबविण्यात आल्या आहेत. स्त्रीहक्क कायदे, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, मातृत्व लाभ कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा इत्यादींनी स्त्रीसुरक्षेला बळ दिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणामुळे लाखो महिलांना राजकीय प्रक्रियेत थेट सहभागाची संधी मिळाली आहे. आज ग्रामपंचायतपासून संसदेपर्यंत महिलांचे प्रतिनिधित्व वाढताना दिसते; तरीही संख्यात्मक वाढीबरोबर गुणवत्तापूर्ण आणि प्रभावी सहभागाची आवश्यकता आहे. शिक्षण हा स्त्रीसशक्तीकरणाचा मूलाधार आहे. मागील काही दशकांत मुलींच्या शालेय प्रवेशदरात लक्षणीय वाढ झाली आहे. उच्चशिक्षणातही मुलींचे प्रमाण वाढत आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा, कला आणि संशोधन या सर्व क्षेत्रांत महिलांनी आपली छाप पाडली आहे. विज्ञानक्षेत्रात कल्पना चावला यांचे अंतराळयात्रेतील योगदान प्रेरणादायी ठरले आहे; क्रीडा क्षेत्रात पी. व्ही. सिंधू, मेरी कोम यांनी जागतिक स्तरावर यश संपादन केले आहे; राजकारणात इंदिरा गांधी यांनी देशाचे नेतृत्व केले आहे. या उदाहरणांमधून स्त्रीच्या क्षमतेला योग्य संधी मिळाल्यास ती कोणतेही शिखर गाठू शकते, हे अधोरेखित होते. तथापि, प्रगतीच्या या वाटचालीत अनेक आव्हाने अजूनही कायम आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांच्या संधींमध्ये तफावत दिसून येते. काही ठिकाणी मुलींचे शिक्षण माध्यमिक स्तरानंतर खंडित होते. लवकर लग्न, कुपोषण, आरोग्यसेवेची अपुरी उपलब्धता, लैंगिक भेदभाव, कौटुंबिक हिंसा, मानवी तस्करी, कार्यस्थळी छळ, वेतनातील असमानता अशी विविध स्वरूपे स्त्रीच्या विकासाला अडथळा निर्माण करतात. डिजिटल युगातही महिलांचा तंत्रज्ञानातील सहभाग तुलनेने कमी आहे. सायबर छळासारख्या नव्या समस्या उभ्या राहत आहेत. म्हणूनच महिला दिन हा केवळ गौरवाचा नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवसही आहे. आर्थिक सशक्तीकरण हा स्त्रीच्या स्वावलंबनाचा कणा आहे. स्वयंसहायता बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांनी बचत, सूक्ष्म वित्त आणि लघुउद्योगाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. हस्तकला, शेतीपूरक व्यवसाय, दुग्धव्यवसाय, खाद्यप्रक्रिया उद्योग अशा विविध उपक्रमांत महिलांचा सहभाग वाढत आहे. शहरी भागात उद्योजकतेकडे महिलांचा कल वाढत असून स्टार्टअप संस्कृतीतही त्या पुढे येत आहेत. मात्र, भांडवलाची उपलब्धता, बाजारपेठेचा विस्तार आणि कौशल्यविकास यांसाठी अधिक धोरणात्मक पाठबळ आवश्यक आहे. समान वेतनाची अंमलबजावणी आणि कार्यस्थळी सुरक्षित वातावरणाची हमी देणे ही शासन व समाज दोघांची जबाबदारी आहे. सामाजिक-सांस्कृतिक स्तरावर स्त्रीची प्रतिमा बदलण्याची गरज आहे. माध्यमांमध्ये स्त्रीचे वस्तुकरण टाळणे, मुलगा मुलगी भेदभाव नष्ट करणे, घरगुती जबाबदाऱ्या समसमान वाटून घेणे, पालकत्वाची जबाबदारी दोघांनी स्वीकारणे या मूल्यांचा प्रसार झाला पाहिजे. लिंगसंवेदनशील शिक्षण आणि समाजीकरणामुळे पुढील पिढी अधिक समताधिष्ठित विचार स्वीकारू शकेल. महिला दिनानिमित्त शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि शासन विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात; परंतु या उपक्रमांचा परिणाम वर्षभर टिकणारा असणे महत्त्वाचे आहे. आजच्या काळात स्त्री नेतृत्वाचे विविध आयाम दिसून येतात. प्रशासन, न्यायव्यवस्था, विज्ञान-तंत्रज्ञान, संरक्षण, कला, साहित्य, माध्यमे अशा सर्व क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. ग्रामीण भागातील महिला सरपंचांनी गावविकासाची दिशा बदलली आहे; स्वयंसेवी क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी सामाजिक परिवर्तन घडवून आणले आहे; संशोधक महिलांनी नवकल्पना साकारल्या आहेत. या सर्व उदाहरणांमुळे स्त्रीशक्तीचे व्यापक आणि बहुआयामी स्वरूप स्पष्ट होते. मात्र, प्रतिनिधित्वाची संधी सर्व स्तरांपर्यंत पोहोचावी, यासाठी संरचनात्मक अडथळे दूर करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरही महिला सशक्तीकरण हा विकासाचा प्रमुख अजेंडा ठरला आहे. लिंगसमानता ही शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी एक महत्त्वाची संकल्पना आहे. शिक्षण, आरोग्य, आर्थिक संधी, राजकीय सहभाग आणि हिंसामुक्त जीवन या सर्व घटकांचा समावेश लिंगभाव न्यायात होतो. महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येक देश आपापल्या प्रगतीचा आढावा घेतो आणि उर्वरित अंतर भरून काढण्यासाठी धोरणे आखतो. भारतानेही 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ', 'उज्ज्वला', 'सुकन्या समृद्धी' यांसारख्या योजनांद्वारे मुलींच्या सक्षमीकरणाचा प्रयत्न केला आहे; परंतु या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृती तितकीच गरजेची आहे. स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्न केवळ महिलांचा नसून संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी निगडित आहे. ज्या समाजात स्त्रीला सन्मान, सुरक्षा आणि संधी मिळतात, तो समाज अधिक सर्जनशील, समताधिष्ठित आणि प्रगतिशील बनतो. घर, शाळा, कार्यक्षेत्र आणि सार्वजनिक जीवन या सर्व स्तरांवर लिंगसमानतेची जाणीव रुजवणे आवश्यक आहे. पुरुषांनीही या परिवर्तन प्रक्रियेत सक्रिय सहभागी होणे गरजेचे आहे. कारण समानतेची लढाई ही परस्पर विरोधाची नसून सहकार्याची आहे. महिला दिन आपल्याला भूतकाळातील संघर्षांची आठवण करून देतो, वर्तमानातील यशाचा गौरव करतो आणि भविष्याच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देतो. आज घोषणांपेक्षा कृतीची, प्रतीकात्मक सन्मानापेक्षा वास्तविक संधींची आणि तात्पुरत्या उत्साहापेक्षा सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज आहे. प्रत्येक मुलीला गुणवत्तापूर्ण शिक्षण, सुरक्षित वातावरण, आरोग्यसेवा आणि स्वप्नपूर्तीची संधी मिळाली पाहिजे. प्रत्येक महिलेला निर्णयप्रक्रियेत स्थान, आर्थिक स्वावलंबन आणि सन्माननीय आयुष्याचा अधिकार मिळाला पाहिजे.

८ मार्चचा दिवस हा केवळ दिनदर्शिकेतील एक तारीख नसून समाजपरिवर्तनाची प्रेरणा आहे. स्त्रीच्या कर्तृत्वाला मान्यता देताना तिच्या वेदनांना आणि संघर्षांना विसरून चालणार नाही. समतेचे स्वप्न साकार करण्यासाठी शासन, समाज आणि कुटुंब या तिन्ही स्तरांवर एकात्मिक प्रयत्नांची गरज आहे. नारीशक्तीचा सन्मान, संरक्षण आणि सशक्तीकरण हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

# 'महीला सुरक्षित तर देश सुरक्षित,देश सुरक्षित तर जग सुरक्षित'

८ मार्च आंतरराष्ट्रीय महीला दीवस हा महीलांसाठी प्रेरणादायी ठरला पाहिजे.कारण जगातील महिलांनी पुर्वीच्याकाळी काय संघर्ष केला आणि आता कसा संघर्ष करावा लागत आहे याची आठवण ८ मार्चच्या निमित्ताने दिसून येते.महीला दिनाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारने व आम नागरिकांनी स्विकारली पाहिजे. कारण महीला ही प्रत्येकांची आई, मुलगी, बहिण, पत्नी, वैनी, आत्या, मामी, माउशी, आजी, सुन, सासु, काकु इत्यादी मानसन्मानाची उपमा व मानाचे पद आहे त्याचे पालन सर्वांनीच करायला हवे.यामुळे महीलांमध्ये व समाजामध्ये मोठी उर्जा निर्माण होवून एक नवीन चालना मिळुन शकते. देशात किंवा जगात महीलांची एक महत्वपुर्ण भुमिका असते. आज देश स्वतंत्र्या पासुन तर देशाच्या विकासापर्यंत महीलांचा मोठा हातभार लागला आहे.देश विकासाच्या दृष्टीकोणातुन आज महीला अग्रेसर आहेत. परंतु २१ व्या शतकात महीला स्वतःला असुरक्षित समजतात ही चिंताजनक बाब आहे.आज महीला सुरक्षा विभाग, खेळ विभाग, उद्योग क्षेत्र आणि अनेक सरकारी व खासगी क्षेत्रात महिला मोठ्या प्रमाणात दीसुन येतात. अनेक निवडणुकांमध्ये महीलांसाठी आरक्षणसुध्दा आहे.परंतु पुरूष प्रधान देशात राजकीय पुढाऱ्यांनी महीलांना अजुनपर्यंत पुर्ण स्वतंत्र दील्याचे दीसत नाही.लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये अजुन पर्यंत महीलांना सरकारने आरक्षण जाहीर केलेले नाही. ही महीलांच्या प्रती शोकांतिकाच म्हणावी लागेल. खालच्या स्तरावरील निवडणुकांमध्ये महीलांना आरक्षण आहे ही स्वागतार्ह बाब आहे.परंतु उच्चस्तरीय राजकारणात सरकारने महीलांना कोसो दुर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. भारतात रनरागीनी झाशीची राणी लक्ष्मीबाई पासुन तर आतापर्यंत महीलांनी देशाला स्वातंत्र्याकरीता, सुजलाम्-सुफलाम करण्याकरीता आणि देशाला विकासाच्या नविन शिखरावर नेण्याचे काम भारतीय महीलांनी नेहमीच केले आहे ही आनंदाची,गौरवाची व अभिमानास्पद बाब आहे.त्याच प्रमाणे देशहीताच्या कामासोबत भारतीय संस्कृतीचे जतन कसे केले पाहिजे याची शिकवणसुध्दा 'महीलांपासूनच' सर्वांना मिळत असते.कथेच्या माध्यमातून किंवा गोष्टींच्या आधारे वृध्द महिला बालगोपालांना 'संस्कृतीचा'पाठ शिकवित असतात.म्हणुनच देश घडविण्याकरीता पुरूषांचा जीतका वाटा आहे तीतकाच वाटा महीलांचा आहे.त्यामुळे ८ मार्च हा दीवस महीलांसाठी नविन दीशा ठरणारा सिध्द व्हायला पाहिजे.सेवाभावी संस्था, डॉक्टर, नर्स, पायलट, वकील, राष्ट्रपती, जज, पोलिस विभागा आणि आता महीलांना आर्मीमध्येसुध्दा मोठ्या प्रमाणात प्राधान्य देण्यात येत आहे. म्हणजेच आजची महीला पुरूषांच्या बरोबरीने चालुन देशाला नवीन दीशा देण्याचे काम करीत असल्याचे मी समजतो. पुर्वी महीलांना अनेक क्षेत्रात स्वतंत्र नव्हते. परंतु आधुनिक युगात महीला सक्षम आहे.त्यामुळे संपूर्ण क्षेत्रात महिला अग्रेसर असल्याचे दिसून येते.महीला राष्ट्रपती,महीला मुख्यमंत्री, महीला प्रधानमंत्री, वैज्ञानिक, लोकसभा अध्यक्ष, पोलिस कमिशनर, उपमुख्यमंत्री, अंतराळवीर, इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण पदांवर महीला विराजमान होत्या,आहे आणि पुढेही राहु शकतात याला नाकारता येत नाही. महीलांच्या या महत्त्वपूर्ण पदांमुळे भारतात महीलांनी इतिहास सुध्दा घडविला आहे. माओवादग्रस्त भागासाठी आदीवासी भागातील माडिया जमातीतील डॉ. कोमल मडावी ही एक प्रेरणादायी महीला ठरली तीची स्तुती कराल तीतकी कमी पडेल.आज भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात महिलांनी आपले नाव लौकीक केले आहे. राजकारण, समाजकारण, सुरक्षा, चित्रपट सृष्टी, खेळजगत,आर्मि, वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, वैमानिक इत्यादीसह अनेक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर सुध्दा महीलांनी भरारी मारली आहे आणि प्रत्येक देशातील महीलांनी आपल्या देशाचे नाव लौकीक करून सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे. भारतीय महीलांनी सर्वच स्तरात उंच भरारी मारली आहे त्याचसोबत भारतीय संस्कृती टीकवुन ठेवण्याची महत्वपूर्ण भुमिका भारतीय महिलांचीच आहे.महीलांचा वाढता विकास ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून व जगाच्या दृष्टीकोनातून स्वागतार्हबाब आहे.परंतु भारतात महीलांवर वाढते अत्याचार रोखण्यासाठी देशातील राज्य सरकारे असमर्थ असल्याचे दिसून येते.या करीता महीलांवरील वाढता अत्याचार पहाता सरकारने 'फास्ट ट्रॅक'कोर्ट अंमलात आणुन महीलांवर होत असलेले अत्याचार यावर अंकुश लावला पाहिजे. कारण आजच्या(सोशल मिडियाच्या) मोबाईलच्या युगामुळे महीलांवरील अत्याचार वाढत आहे.कारण महीलांवरील अत्याचार पहातो किंवा ऐकतो तेव्हा अंगावर शहारे येतात अशा अनेक घटना भारतात घडलेल्या आहे.मुलींचे अपहरण, अत्याचार किंवा त्यांची हत्या यावर पुर्णतः अंकुश लावण्याची गरज आहे.आंतरराष्ट्रीय महीला दीवसाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेला सर्वात जास्त प्राधान्य सरकारने द्यायला पाहिजे. 'महीला सुरक्षित तर देश सुरक्षित,देश सुरक्षित तर जग सुरक्षीत' तेव्हाच खऱ्याअर्थाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाला महत्त्व येईल.मानवाने मानुसकीचे पालन केले तर महीलांवरील अत्याचारावर आपोआपच अंकुश लागु शकतो. ज्या प्रमाणे महीला मुलांचे संगोपन करते त्याचप्रमाणे महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी मानवाने स्वीकारली पाहिजे. तेव्हाच महीला सुरक्षित राहू शकतात.कारण महीलांवरील अत्याचार हा गंभीर आणि चिंतेचा विषय आहे. त्यामुळे देशाच्या व जगाच्या दृष्टीकोनातून ही धोक्याची घंटा आहे.आज भारताचा विचार केला तर महीला अत्याचाराच्या लाखो केसेस कोर्टामध्ये प्रलंबित आहेत आणि महीलांवरील अत्याचाराच्या अनेक केसमध्ये 'तारीख पे तारीख'असा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे गुन्हेगारांना वेळेवर सजा व पिडीतेला वेळेवर न्याय मिळत नाही ही शोकांतिका आहे.यावरून स्पष्ट होते की आजच्या परिस्थितीत महीला सुरक्षित नाही.८ मार्च महीला दीवसाचे औचित्य साधून भारतासह संपूर्ण जगाने महीला सुरक्षेचा 'संकल्प'केला पाहिजे आणि महीलांच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीची वागणूक दिली पाहिजे.महीलांचा सन्मान म्हणजे नारी जातीचा सन्मान,नारी जातीचा सन्मान म्हणजे देशाचा सन्मान,देशाचा सन्मान म्हणजे आंतरराष्ट्रीय महीला दीनाचा सन्मान.यातच खऱ्याअर्थाने महीला सशक्तीकरण दीसुन येईल.म्हणुनच म्हणतात 'बेटी बचाव बेटी पढाव'. महीला देवी-देवतांच्या सान्नीध्यात राहुन आपला परीवार मंगलमय कसा राहील या दीशेने त्यांचे कार्य सुरू असते व संपूर्ण परीवाराची एक महीला आशेचे किरण घेऊन सर्वांना सावरण्याचा प्रयत्न करीत असते.त्यामुळे महीला उन्हात सावली देण्याचे,हीवाळ्यात उब देण्याचे काम परिवाराला करीत असते.त्यामुळे प्रत्येक महीलेला देवीच्याच रूपात पहायला पाहिजे.आज रशिया -युक्रेन युध्दा दरम्यान आपला देश वाचवीण्यासाठी आरपारची लढाई लढत आहे. यासाठी मुख्यत्वेकरून त्यांच्या पत्नींनी व मुलींनी सैनिकांचे मनोबल वाढवीले आहे.म्हणजेच मानसाचे मनोबल व धौर्य वाढवण्यासाठी महीलांची अतुट शक्ती असल्याचे दिसून येते. असे माझे स्पष्ट मत आहे.आंतराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महिलांना मी आग्रह व विनंती करतो की जगात व देशात बदलत्या हवामानामुळे वाढते प्रदूषण व जंगलतोड पहाता आजच्या दिवसाला प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल. यामुळे सर्वांना शुद्ध हवा, ऑक्सिजन, सावली व गुरांना चारा मिळण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल.जय हिंद!जय भारत.

**- रमेश कृष्णराव लांजेवार.**

# नांदेड विभागात फेब्रुवारी महिन्यात व्यापक तिकीट तपासणी मोहीम - विनातिकीट व अनियमित प्रवाशांकडून मोठी वसुली

नांदेड, दि. ७ (प्रतिनिधी) -दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने फेब्रुवारी २०२६ महिन्यात रेल्वे गाड्या व स्थानकांवर व्यापक तिकीट तपासणी मोहीम राबवली. विनातिकीट प्रवास रोखणे तसेच प्रामाणिक प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी व त्रासमुक्त प्रवास उपलब्ध करून देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता. या मोहिमेदरम्यान मोठ्या प्रमाणात विनातिकीट व अनियमित प्रवासी आढळले. एकूण २३,०५१ प्रकरणे नोंदवण्यात आली असून त्यातून १.३१ कोटी रुपयांचा महसूल वसूल करण्यात आला. फेब्रुवारी २०२५ मध्ये १९,२६० प्रकरणांतून १.०६ कोटी रुपये वसूल झाले होते. याच्या तुलनेत यंदा २३.५८ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. विनातिकीट प्रवासाला आळा घालणे, रेल्वे प्रवासात शिस्त राखणे आणि वैध तिकीट घेऊन प्रवास करणाऱ्या प्रामाणिक प्रवाशांचे हक्क व सुविधा सुरक्षित ठेवणे या उद्देशाने विभागाकडून सातत्याने तिकीट तपासणी मोहिमा राबवल्या जातात. नियमित तसेच अचानक तपासणीमुळे गर्दीवर नियंत्रण ठेवणे, उच्च श्रेणीमध्ये अनधिकृत प्रवास रोखणे आणि रेल्वे सेवांचा गैरवापर टाळणे शक्य होते.

**तपासणीदरम्यान खालीलप्रमाणे प्रकरणे आढळली :**

* विनातिकीट प्रवास: १६,७५८ प्रकरणे
* अनियमित प्रवासी / उच्च श्रेणीत अनधिकृत प्रवास: ४,३५४ प्रकरणे
* बुकिंग न केलेले सामान: १,९३९ प्रकरणे

ही मोहीम प्रभावीपणे राबवण्यासाठी ३४ स्क्वॉड कर्मचारी, १६७ ॲमेनिटीज कर्मचारी आणि १८ स्टेशनरी कर्मचारी सहभागी झाले होते. तसेच रेल्वे संरक्षण दल (ठझक) कर्मचाऱ्यांनीही सक्रिय सहकार्य केले.

फेब्रुवारी महिन्यात विभागातील महत्त्वाच्या स्थानकांवर व गाड्यांमध्ये १३ फोर्ट्रेस तपासण्या आणि २ मोठ्या तपासण्या घेण्यात आल्या, ज्यामुळे विनातिकीट प्रवासाविरुद्ध कारवाई अधिक मजबूत करण्यात आली. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी एका दिवसातील सर्वाधिक वसुली नोंदवण्यात आली. त्या दिवशी १,२१२ प्रकरणे आढळून ८,२९,३२९ रुपयांचा महसूल वसूल करण्यात आला. अंमलबजावणीबरोबरच विभागात प्रवासी संख्येतही वाढ झाली आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये २.८४४ दशलक्ष प्रवाशांनी प्रवास केला असून त्यातून ४६.३२ कोटी रुपयांचा महसूल मिळाला. फेब्रुवारी २०२५ मध्ये २.७३८ दशलक्ष प्रवासी आणि ३८.८६ कोटी रुपये महसूल नोंदवला गेला होता. यानुसार प्रवासी महसुलात १९.२० टक्के वाढ तर प्रवासी संख्येत ३.८७ टक्के वाढ झाली आहे. याशिवाय, फेब्रुवारी २०२६ पर्यंतच्या एकूण तिकीट तपासणी वसुलीत २०.११ टक्के वाढ झाली असून एकूण प्रवासी महसुलात ८.५९ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. नांदेड विभाग सर्व प्रवाशांना वैध तिकीट घेऊनच प्रवास करण्याचे आणि रेल्वे नियमांचे पालन करण्याचे आवाहन करीत आहे. यामुळे सर्व प्रवाशांसाठी शिस्त, सुरक्षितता आणि प्रवासातील सोयीसुविधा कायम राखता येतात. नांदेड विभाग सुरक्षित, विश्वासार्ह आणि प्रवासी-केंद्रित रेल्वे सेवा देण्यासाठी कटिबद्ध असून महसूल संरक्षणासोबतच प्रामाणिक प्रवाशांना सुखद प्रवास अनुभव देण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहे.

# स्मार्ट वीजमीटरसह विविध योजनांचा शाळांतून जागर महावितरणच्या महिला कर्मचाऱ्यांचा पुढाकार



छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील महिला कर्मचाऱ्यांनी महिला दिनानिमित्त वीजबिल वसुली मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्यासह स्मार्ट मीटरसह विविध ग्राहकोपयोगी योजनांचा शाळांतून जागर करण्याचा शुक्रवारी (६ मार्च) उपक्रम राबवला.

दरवर्षी महावितरणमध्ये महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मात्र दरवर्षीच्या चाकोरीबद्ध कार्यक्रमांपेक्षा यंदा काहीतरी आगळावेगळा उपक्रम हाती घ्यावा, अशी कल्पना छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी मांडली. यंदाच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाची अधिकृत संकल्पना (Theme) ' Give To Gain' (मिळवण्यासाठी द्या) ही आहे, जी परस्पर सहकार्य आणि एकत्रित प्रगतीवर भर देते. हे वर्ष महिलांच्या सक्षमीकरणासाठी संसाधने, ज्ञान आणि वेळ देण्याचे महत्त्व अधोरेखित करते. याच संकल्पनेनुसार महावितरणच्या स्मार्ट मीटरसह विविध ग्राहकोपयोगी योजनांचा शहर व ग्रामीण भागातील शाळांमधून जागर करावा तसेच विद्युत सुरक्षा व वीजबचतीचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या पटवून द्यावे तसेच महावितरणच्या महसुलाचा प्रमुख स्रोत असलेल्या वीजबिलाच्या वसुलीसही हातभार लावावा, असे मुख्य अभियंता कछोट यांनी सुचवले. त्यांच्या आवाहनास सर्व महिला अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत शुक्रवारी (६ मार्च) रोजी विविध शाळांत विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले.

अचूक व वेळेवर बिल, वीजवापरावर नियंत्रण, दिवसा वीजवापरावर सवलत हे स्मार्ट मीटरचे फायदे आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या घरी व परिसरात स्मार्ट मीटर बसवण्यासाठी पुढाकार घ्यावा. याबरोबरच पर्यावरणाचे रक्षण करणाऱ्या गो-ग्रीन व ऑनलाईन सुविधांचा लाभ घ्यावा.

तसेच विजेची बचत म्हणजेच विजेची निर्मिती असल्याने विजेचा अपव्यय टाळावा. वीज जशी दिसते, तशीच ती योग्यरीत्या हाताळली नाहीतर दुर्घटना घडतात. त्यामुळे दैनंदिन जीवनात विद्युत सुरक्षेबाबत कायम सजग राहावे, असे आवाहन कर्मचाऱ्यांनी केले. शहरातील देसरडा पब्लिक स्कूल, गजानन माध्यमिक विद्यालय, जागृती हायस्कूल, रायजिंग स्टार इंग्लिश स्कूल, इंटरनॅशनल स्कूल, शासकीय तंत्रनिकेतन, ताडपिंपळगावातील समर्थ विद्यालय, कुंभेफळ येथील जि.प. शाळेसह विविध शाळांत हा उपक्रम घेण्यात आला.

याबरोबरच महिला कर्मचाऱ्यांची विशेष पथके स्थापन करून शहर व ग्रामीण भागातील थकबाकीदारांकडून वीजबिल वसुली करण्यात आली. वसुलीस प्रतिसाद न देणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. या मोहिमेत शहरासह जिल्ह्यातील महावितरणच्या जवळपास सव्वादोनशे महिला कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. या उपक्रमाबद्दल मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी सर्व महिला कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

# 'साधनेद्वारे आत्मतेज जागवणे', हे खरे सबलीकरण!

गेल्या काही वर्षांपासून स्त्री-मुक्ती किंवा महिला सबलीकरण हे विषय चर्चेत आहेत. 'महिलांचे सबलीकरण' हा विषय बहुतांश वेळा आधुनिकीकरण किंवा पाश्चात्त्य अन संस्कृतीविरोधी विचारसरणीच्या प्रभावाने चर्चिला जातो. 'अमर्यादित स्वातंत्र्य म्हणजे मुक्ती' अशी अयोग्य संकल्पना तथाकथित पुरोगामी आणि संस्कृतीविरोधक यांच्याकडून ठसवण्याचा प्रयत्न होत असल्यामुळे आज अनेक महिला, युवती अयोग्य वाटेवर चालल्या आहेत. त्यांना खऱ्या उन्नतीच्या मार्गावर आणायचे असेल, तर अयोग्य संकल्पनांचे जोखड उतरवून टाकून त्यांना योग्य दिशा द्यावी लागेल. ही दिशा संस्कृतीचे अनुसरण आणि धर्माचरण करण्याच्या संदर्भात आहे; कारण साधना करून मिळणारे आत्मतेजच व्यक्तीच्या व्यावहारिक आणि पारलौकिक उन्नतीचा मार्ग प्रशस्त करते.

**हिंदु धर्मात महिलांचे स्थान**

'भारतीय संस्कृतीत महिलांवर अनेक बंधने होती. अलीकडच्या काळात विशेषतः त्यांना शिक्षण मिळू लागल्यावर महिलांना अनेक अधिकार प्राप्त झाले', असा अपप्रचार अनेक जणांकडून केला जातो; पण अभ्यास केल्यावर वस्तुस्थिती वेगळी असल्याचे लक्षात येते. भारतीय संस्कृतीने किंवा सनातन हिंदु धर्माने कोणावरची अन्याय करण्याची कधीही शिकवण दिली नाही, उलट कायम 'वसुधैव कुटुम्बकम' किंवा 'सर्वेत्र सुखिनः सन्तु' अशी प्रार्थना केली आहे. मनुस्मृतीमध्ये 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।' म्हणजे ज्या ठिकाणी नारीची पूजा होते, तेथे देवता रममाण होतात, असे म्हटले आहे. हिंदु धर्माने महिलांना कधीही उपभोग्य वस्तू मानले नाही. उलट हिंदु धर्माने स्त्रीला आदिमाया शक्तीचे रूप मानले आहे. विवाहानंतर कोणतीही पूजा पत्नीच्या सहभागाविना पूर्ण होत नाही. हिंदु धर्मामध्ये देवतांची नावेही लक्ष्मी-नारायण, सीता-राम, राधे-श्याम, गौरी-शंकर अशा प्रकारची आहेत. जेथे स्त्रियांना पुरुषांपेक्षाही उंच स्थान दिले आहे, तेथे स्त्री-पुरुष समानतेच्या गोष्टी करणे म्हणजे स्त्रियांचे अवमूल्यन करण्यासारखे आहे. महिलांसाठी एक दिवस नाही, तर प्रत्येक दिवसच हिंदु धर्माने दिला आहे. देवतांची नावे उच्चारतानाही प्रथम देवींना वंदन करणारा धर्म अन्यायकारक आहे, असे म्हणणे हा निवळ हिंदुद्वेष आहे, हे लक्षात घ्यायला पाहिजे.

**विद्वान, शूर आणि कर्त्या महिला**

भारतीय संस्कृतीत अनेक विद्वान, पराक्रमी, कुशल महिला होऊन गेल्या. महाभारतीय युद्धात काश्मीर राजा ठार झाल्यानंतर त्याची पत्नी यशोमती हिचा राज्याभिषेक स्वतः भगवान श्रीकृष्णाने केला होता. अर्जुनाची एक पत्नी चित्रांगदा मणिपूर राज्याची राणी होती. राम वनवासात निघाले, तेव्हा राजगुरु वसिष्ठ ऋषींनी सीता राज्यकारभार करण्यास कुशल आणि सक्षम असल्याने तिचाच राज्याभिषेक करावा, असे सुचवले होते; मात्र सीतेने रामासह वनवासात जाण्याची अनुज्ञा मागितल्याने तिने राज्यकारभार केला नाही, असा उल्लेख वाल्मीकि रामायणात आहे. तात्पर्य हिंदु धर्माने कधीही स्त्रीला कर्तेपणापासून रोखलेले नाही. पुराणांमध्ये अनेक विदुषींचे उल्लेख आढळतात. गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा आदी विदुषी वेद-शास्त्रामध्ये पारंगत होत्या. माता कैकेयीचे वर्तन कसेही असले, तरी दशरथ राजासह कैकेयेही युद्धात शस्त्र हाती धरून लढाई करत असल्याचे वर्णन आहे. अलीकडच्या काळातील उदाहरण पाहायचे म्हटले, तर राणी लक्ष्मीबाई या युद्धशास्त्रात पारंगत होत्या. देशप्रेमाने ओतप्रोत असल्यानेच चिमुकल्या बाळाला पाठीला बांधून त्या युद्ध लढायला गेल्या. शहाजीराजे कर्नाटकमध्ये असतांना राजमाता जिजाई यांनी पुणे जहागिरीचा राज्यकारभार सांभाळला. छत्रपती राजारामाची पत्नी राणी ताराबाई यांनी कर्त्या होऊन कोल्हापूर संस्थान स्थापन केले होते. अहल्याबाई होळकर पतीनिधनानंतर होळकर घराण्याच्या कर्त्या झाल्या होत्या. थोडक्यात शूर-वीर, विद्वान महिलांची परंपरा भारताला लाभली आहे.

या परंपरेचे पाईक व्हायचे असेल, तर आपल्यातील गुणांचा विकास करून त्रुटींवर आणि न्यूनगंडावर मात केली पाहिजे. 'तोकडे किंवा पाश्चात्त्य कपडे म्हणजे आधुनिकपणा', 'इंग्रजी बोलणे म्हणजे पुढारलेपण' अशा अंधश्रद्धा झटकून टाकल्या पाहिजेत. स्वैराचारासारख्या गोष्टींचा त्याग केला पाहिजे. स्वातंत्र्य आणि स्वैराचार यांमध्ये भेद आहे. तो समजून घ्यायला हवा. कुटुंबव्यवस्था हे भारताचे बलस्थान आहे. स्त्री ही कुटुंबव्यवस्थेचा कणा आहे. हा कणा जेवढा कणखर असेल, तेवढी कुटुंबव्यवस्था सुदृढ राहील. सांस्कृतिक मूल्यांची जोपासना स्त्रियांनी अधिक प्रमाणात केली आहे. आज जगभरातील लोकही 'बॅक तो मदरहूड' म्हणत कुटुंबव्यवस्था जोपासण्याचा प्रयत्न करत आहेत. आपणही शालीनता, सुसंस्कृतपणा टिकवून ठेवण्याचे संस्कार केले पाहिजेत.

**असुरक्षित महिला**

आज देशाच्या परिस्थितीचा विचार केला, तर महिला असुरक्षित आहेत. ज्या देशात एका महिलेच्या शीलरक्षणाच्या सूत्रावरून रामायण, महाभारत घडले, त्या देशात आज प्रतिदिन शेकडो महिला अत्याचाराच्या बळी ठरत आहेत. 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो'च्या आकडेवारीनुसार वर्ष २०१९ मध्ये भारतात महिलांवरील हिंसाचाराच्या संदर्भात ४.०५ लाख घटनांची नोंद झाली. यातील ३० टक्के घटना या घरगुती हिंसाचाराच्या आहेत, तर ८ टक्के घटना बलात्काराच्या आहेत.'ऑक्सफेम' या जागतिक विश्लेषण संस्थेने भारतात प्रत्येक १५ मिनिटाला एका मुलीवर बलात्कार होत असल्याचे म्हटले आहे. देशात वर्ष २०१८ मध्ये बलात्काराच्या ३४ सहस्र घटनांची नोंद झाली. ८५ टक्के प्रकरणात आरोप निश्चित झाले; पण शिक्षा केवळ २७ टक्के लोकांना होऊ शकली, असे या अहवालात म्हटले आहे. धर्मशिक्षणाच्या अभावी अनेक हिंदु युवती आज 'लव्ह जिहाद'ची शिकार होत आहेत.

रामराज्यामध्ये महिला मध्यरात्रीची दागिने घालून एकटी जाऊ शकत असे. आज तशी स्थिती नाही; कारण आज रामराज्य नाही. छत्रपती शिवाजी महाराजच्या काळातही महिलांकडे वाकड्या दृष्टीने पाहणाऱ्या रांझ्याच्या पाटलाला हात-पाय तोडले जाण्याची शिक्षा मिळाली होती. आज त्वरित शिक्षा होणे तर दूरच; पण पीडित महिलेची तक्रारही सहजासहजी नोंदवली जात नाही, ही वस्तुस्थिती आहे. केवळ कठोर कायदे करून ही स्थिती पालटली जाणार नाही, तर त्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न व्हावे लागतील.

**शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक सक्षमता**

महिलांना खऱ्या अर्थाने सक्षम बनवायचे असेल, तर शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक अशा ३ स्तरांवर उपाय करावे लागतील. प्रसिद्धीच्या स्टंटपायी गाभाऱ्यात घुसल्याने महिलांचे सक्षमीकरण होत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. महिलांना शारीरिक स्तरावर सक्षम बनवण्यासाठी त्यांना स्वसंरक्षण प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर त्यासाठी प्रयत्न होऊ शकतात; पण केवळ शारीरिक सक्षमता पुरेशी नाही. प्रसंगांना सामोरे जाण्याचे मनोबल आणि आत्मबल आवश्यक असते. हे बळ साधना आणि धर्माचरण याद्वारेच प्राप्त होऊ शकते. आज अनेक जणी, अगदी विवाहित महिलाही कपाळावर लाल गोल कुंकू लावायची लाज बाळगतात. आधुनिकतेच्या नावाखाली पारंपरिक भारतीय पेहराव सोडून तोकडे कपडे घालतात. अशा प्रकारे उच्छृंखल वागण्याने मनोबल आणि आत्मबल प्राप्त होऊ शकणार नाही, तर हे बळ मिळवण्यासाठी साधनाच करावी लागेल. भक्ती आणि साधनेचे बळ असल्यानेच संत मीराबाई यांच्यावर जीवघेणी संकटे ओढवली, तरी श्रीकृष्णाने त्यांचे अद्भुतरित्या रक्षण केले. भक्तीमध्येच शक्ती आहे, हे लक्षात घेऊन आपली भावभक्ती वाढवायला हवी. 'साधनेद्वारे आत्मतेज जागवणे', हे खरे सबलीकरण आहे, हे लक्षात घ्यायला हवे. राजमाता जिजामाता, झाशीची राणी लक्ष्मीबाई, देवी अहिल्याबाई होळकर, राणी चेन्नम्मा यांच्या आदर्शांवर चालणे, हेच खरे सशक्तीकरण आहे.

**– संकलक : कु. प्रियांका लोणे,**
मराठवाडा संघटक, हिंदु जनजागृती समिती, संपर्क क्र.: ८२०८४४३४०१

# जागतिक महिला दिन जिथे स्त्रीचा सन्मान होतो, तिथेच खऱ्या अर्थाने राष्ट्राचा विकास होतो! - रचना पहाडे जैन

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – आजची स्त्री ही घरापुरती मर्यादित नसून अंतराळापासून ते उद्योगजगतापर्यंत प्रत्येक क्षेत्रात आपली छाप उमटवत आहे. महिलांच्या या कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा केला जातो. स्त्रियांच्या स्वातंत्र्य, हक्कांसाठी आणि समानतेसाठी केलेल्या लढ्यांच्या स्मरणार्थ हा दिवस जागतिक स्तरावर साजरा केला जातो. आजच्या युगात स्त्रिया फक्त घरापुरत्याच मर्यादित नसून शिक्षण, विज्ञान, राजकारण, क्रीडा, उद्योग अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत आणि आपल्या अस्तित्वाची जाणीव जगाला करून देत आहेत.



परंतु आजही अनेक ठिकाणी महिलांना समान संधी मिळत नाहीत. हिंसा आणि अत्याचारासारख्या समस्या समोर येत आहेत. आपल्याला खरे समतोल समाज घडवायचा असेल तर मुलगा-मुलगी भेदभाव न करता महिलांना योग्य सन्मान देणे गरजेचे आहे. तिथेच खऱ्या अर्थाने स्त्रीचा विकास होईल. नव निर्मितीची संकल्पना घेऊ या, रचना नवं कलाकृती करू या. एक दिवस तरी स्त्रीच्या अस्तित्वासाठी साजरा करू या... अशी माहिती समाजसेविका रचना पहाडे जैन यानी दिली.

# तीन गावांतील २९ वीजचोरांवर गुन्हे दाखल

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) – तालुक्यातील फतियाबाद, पिसादेवी व गोपाळपूर मांडकी या गावांत महावितरणने राबवलेल्या धडक मोहिमेत २९ जण वीजचोरी करताना आढळले. मात्र वीजचोरीची बिले भरण्यास टाळाटाळ केल्याने आरोपींवर छावणी व चिकलठाणा पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले. महावितरणच्या या धडाकेबाज कारवाईमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहे.

माळीवाडा येथील महावितरणचे तत्कालिन सहायक अभियंता मोहंमद अब्दुल हकीम व वरिष्ठ तंत्रज्ञ नितीश पाल्हाळ यांनी गंगापूर तालुक्यातील फतियाबाद येथे २ ऑगस्ट व १७ सप्टेंबर २०२४ तसेच ३ एप्रिल व १२ जून २०२५ रोजी वीजचोरीविरोधात मोहीम राबवली. यात लक्ष्मण महादू भगत याने १० हजार २११, शिवाजी मोतीराम गायकवाड याने ८ हजार ४१९, राजू नामदेव भास्कर याने १० हजार ९९, नवनाथ भानुदास शेळके याने २८ हजार ३७६, विनायक पाल्हाळ याने ९ हजार ८१६. शिवनाथ देविदास शेळके याने ८ हजार १४८, समीर अरुण टाकलकर याने ४३ हजार ४३३, विजय गोपीचंद बनसोडे याने ८ हजार ५०५, नितीन जाधव याने ८ हजार ६९१, ताराबाई देशमुख यांनी ८ हजार ६१४, रामू देवराव आदमाने याने ५ हजार ८८०, सविता सोमनाथ साळुंके यांनी ९ हजार ४०, विठ्ठल जाधव याने ८ हजार ७८८, चैनसिंग कप्पुसिंग घुसिंगे याने ८ हजार ४९०, बबन अर्जुन जाधव याने ८ हजार ४४०, शिवाजी मोतीराम गायकवाड याने ८ हजार ६२०, शिवनाथ देविदास शेळके याने ५ हजार ७४०, रघुनाथ दगडू सोनवणे याने ८ हजार ६२०, बाबासाहेब तुकाराम पाल्हाळ, याने ८ हजार ६२०, दीपक गोरखनाथ खिल्लारे याने १० हजार ३५०, भानुदास भाऊसाहेब शेळके याने ७ हजार ४७० रुपयांची वीजचोरी केली. या सर्वांनी २ लाख ३४ हजार ३७० रुपयांची १० हजार ४१४ युनिट वीजचोरी केली. या सर्व आरोपींनी वीजचोरीची बिले व प्रत्येकी २ हजारांचे तडजोड शुल्क भरण्यास टाळाटाळ केली. सहायक अभियंता मोहंमद अब्दुल हकीम यांनी छावणी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनंतर आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला.

हर्सुल ग्रामीण शाखेचे सहायक अभियंता शेख फेरोज यांच्यासह प्रधान तंत्रज्ञ शौकत शैख, वरिष्ठ तंत्रज्ञ बळीराम पळसकर, रमेश चोरमारे, व्ही. आर. पट्टेकर, विठ्ठल धायगुडे यांनी ३ नोव्हेंबर २०२५ रोजी लक्ष्मी पार्क, पिसादेवी येथे तपासणी मोहीम राबवली. यात कैलास भागाजी पंडित याने ३४ हजार १९०, संजय भुसारे (मालक), किरण सोमाजी दाभाडकर याने २७ हजार ४२० रुपयांची वीजचोरी केली. दोन्ही आरोपींनी ६१ हजार ६१० रुपयांची ३ हजार ३२७ युनिट वीजचोरी करून महावितरणचे आर्थिक नुकसान केले. याच पथकाने १५ जानेवारी तसेच १४ व १५ जुलै २०२५ रोजी गोपाळपूर, मांडकी येथे मोहीम राबवली. धर्माजी भागाजी म्हस्के याने १० हजार ९४०, गणेश जनार्धन वाडेकर याने २६ हजार १४८, मंदा विजय चंदनशिव यांनी १४ हजार ७१४, दुर्योधन वडेकर (मालक) संजय कापसे (भाडेकरू) यांनी ३३ हजार ७१०, मोईनोद्दिन चांद शहा याने ३० हजार ३६२ रुपयांची वीजचोरी केली. या सर्वांनी १ लाख १५ हजार ८७४ रुपयांची ६ हजार ४१३ युनिट वीजचोरी केली. सहायक अभियंता शेख फेरोज यांच्या फिर्यादीवरून सर्व आरोपींवर चिकलठाणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# अलिना आदिल चाऊसचा १३ तासाचा रोजा



वैजापूर, दि. ७ (प्रतिनिधी) – येथील शिवराई रस्त्यालगत असलेल्या भारतनगर वसाहतीत राहणारी वय ८वर्षे असणारी अलिना आदिल चाऊसने १३ तास १६मिनिटांचा रोजा उपवास करून रमजानच्या पवित्र महिन्यात आपला पहिला रोजा उपवास पूर्ण करून प्रार्थना केली. तिच्या या पहिल्या रोजा उपवास बद्धल सर्वत्र तिचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# शहरातील प्रमुख प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्याचा महापौर रवि लांडगे यांचा निर्धार

पुणे दि. ७ (प्रतिनिधी) – महापौर पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर गेल्या एका महिन्यात शहरातील विविध भागांना भेटी देत नागरिकांच्या समस्या तसेच नगर सदस्यांनी मांडलेल्या मुद्द्यांच्या प्रत्यक्ष माहितीव्दारे शहरातील प्रमुख प्रश्नांची यादी तयार करण्यात आली असून त्यावर टप्प्याटप्प्याने काम सुरू करण्यात आले आहे. नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि वैद्यकीय सुविधांशी संबंधित समस्यांवर महापालिकेच्या माध्यमातून प्रभावी उपाययोजना करण्यावर भर देण्यात येत आहे, अशी माहिती महापौर रवि लांडगे यांनी दिली.



६ फेब्रुवारी २०२६ रोजी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या महापौरपदी रवि लांडगे यांची बिनविरोध निवड करण्यात आली होती. त्यांच्या महापौर पदाच्या कार्यकाळाला एक महिना पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आज आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या परिषदेस उपमहापौर शर्मिला बाबर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले,' शहरातील पाणीपुरवठ्याच्या समस्येबाबत नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्याने या विषयाला प्राधान्य देण्यात आले आहे. शहरात वाढत चाललेल्या भटक्या श्वानांच्या प्रश्नावर देखील लवकरच ठोस उपाययोजना करण्यात येणार आहेत.

क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी पिंपरी चिंचवड शहरातील अण्णासाहेब मगर स्टेडियम खासगी तत्त्वावर विकसित करून तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे अत्याधुनिक स्टेडियम उभारण्याचा मानस असल्याचेही महापौरांनी सांगितले. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने शहरातील प्रत्येक उद्यानामध्ये 'ऑक्सिजन सेंटर' उभारण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात येणार असून या उपक्रमात नागरिकांचा सक्रिय सहभाग घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. याशिवाय कचरा व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण आणि शहराच्या मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा या मुद्द्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. तसेच शहरातील महत्वाकांक्षी 'अजित सृष्टी' प्रकल्प उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्या संकल्पनेनुसार पुढे नेण्यात येणार असल्याची माहितीही महापौर रवि लांडगे यांनी यावेळी दिली.

## महिला सक्षमीकरण

महिला सक्षमीकरणाच्या
केवळ कागदावरच गप्पा
अन्याय,अत्याचारांचा असे
रोज,रोज नवं-नवा टप्पा
कर्तृत्व सम्पन्न महिला
जेंव्हा धजतात पुढे
त्यांना आडवे येतात
मोकाट-ऊनाड गुंडे
महिला हितार्थ असावे
शिक्षेचे कडक कायदे
गुन्हेगारांना मिळू नये
कोणतेही हिताचे फायदे
तपास यंत्रणाही
असावी निष्पक्ष
त्यानी ठेऊ नये
पालवटीचे कक्ष
महिलांसाठी कायदे
महिलांसाठी वायदे
यातूनच मिळावे
महिलांना फायदे
महिला सक्षमीकरणाची
बाजू असावी सक्षम
महिलांसाठी कायदे
असावे भर भक्कम
महिला सक्षमीकरण
कागदावरच नसावे
प्रत्यक्ष कृतीतून
ते जगा दिसावे

**–धोंडीरामसिंह राजपूत**

# तेलुगूमध्ये धुमाकूळ घातल्यानंतर नानी स्टारर 'आया शेर'चे हिंदी व्हर्जन रिलीज; श्रीकांत ओडेला यांच्या 'द पैराडाइज'ने रचला वर्षाचा विक्रम

**नानीच्या** वाढदिवशी रिलीज झालेल्या तेलुगू व्हर्जनला मिळालेल्या तुफान प्रतिसादानंतर 'आया शेर' हे यंदाच्या वर्षातील सर्वात मोठे हिट गाणे ठरले; प्रेक्षकांच्या प्रचंड मागणीनंतर आता त्याचे हिंदी व्हर्जनही प्रदर्शित करण्यात आले आहे.

द पैराडाइज या चित्रपटाच्या निर्मात्यांनी सेलिब्रेशनचा उत्साह आणखी वाढवला आहे. तेलुगू गाण्याच्या विक्रमी यशानंतर आता 'आया शेर'चे हिंदी व्हर्जन अधिकृतपणे रिलीज करण्यात आले आहे. नेचुरल स्टार नानी यांच्या वाढदिवशी प्रदर्शित झालेल्या तेलुगू आवृत्तीला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. त्या जबरदस्त यशानंतर आणि हिंदी आवृत्तीच्या वाढत्या मागणीमुळे आता हे गाणे हिंदीतही उपलब्ध झाले असून यंदाच्या वर्षातील आतापर्यंतचे सर्वात मोठे हिट गाणे ठरले आहे.




'आया शेर' म्हणजेच 'शेर आला' ही ओळच गाण्याची ऊर्जा आणि दमदार अंदाज स्पष्ट करते. हे गाणे आधीच एक पॉवर-पॅक अँथम बनले आहे. तेलुगू व्हर्जनने रिलीज होताच यूट्यूब चार्ट्स आणि सोशल मीडियावर धुमाकूळ घातला होता; आता हिंदी व्हर्जनलाही तितकाच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. तेलुगू आवृत्तीने यूट्यूबवर ४४ मिलियनहून अधिक व्ह्यूज आणि १ मिलियनपेक्षा जास्त लाइक्सचा टप्पा ओलांडला आहे. हे गाणे सध्या ट्रेंडिंग ट्रॅक्समध्ये अग्रस्थानी आहे. जगभरातील चाहते इंस्टाग्रामवर नानी यांच्या एनर्जेटिक हुक स्टेपची नक्कल करत रील्स शेअर करत आहेत. चित्रपटातील नानींसाठी हे एक दमदार इंट्रोडक्शन ट्रॅक ठरले आहे. ङ्कआया शेरङ्कचे संगीत अनिरुद्ध रविचंदर यांनी दिले असून कोरिओग्राफी सुधान मास्टर यांनी केली आहे. रॉ एनर्जी, थिरकणारे बीट्स आणि नानी यांची ट्रेडमार्क इंटेन्सिटी यामुळे हे गाणे प्रेक्षकांच्या मनात घर करत आहे. त्यांच्या प्रभावी स्क्रीन प्रेझेन्स आणि डायनॅमिक डान्स मूव्ह्समुळे हा ट्रॅक एक सांस्कृतिक क्षण ठरला असून चाहते त्याचा थिएटरमध्ये उत्सव साजरा करत आहेत.

'द पैराडाइज' हा दिग्दर्शक श्रीकांत ओडेला यांचा आणखी एक महत्त्वाकांक्षी प्रोजेक्ट आहे. त्यांच्या पदार्पणाच्या दसरा या चित्रपटाला प्रचंड प्रशंसा मिळाली होती. अनिरुद्ध यांच्या दमदार संगीतासोबतच अरजुन चांडी यांच्या आवाजाने गाण्याला वेगळीच उंची दिली आहे, ज्यामुळे चित्रपटाची भावनिक खोली आणि भव्यता अधिक प्रभावी बनली आहे. सिनेमाजच्या निर्मितीत साकारलेला 'द पैराडाइज' २१ ऑगस्ट २०२६ रोजी आठ भाषांमध्ये भव्य जागतिक प्रदर्शित होणार आहे. दूरदृष्टी असलेले दिग्दर्शन, प्रभावी अभिनय आणि यंदाच्या वर्षातील सर्वात मोठा म्युझिकल हिट या जोरावर हा चित्रपट एक जागतिक सिनेमॅटिक इव्हेंट ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
**: संपादक :**
**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

### छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर टप्पा-१ चा प्रारंभ

# नागरिकांनी सेवांचा लाभ घ्यावा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा -१ ला आज जिल्ह्यात १० ठिकाणी प्रारंभ झाला. १० मंडळस्तरावर आज मोठ्या उत्साहात समाधान शिबीरांचे आयोजन करण्यात आले. शेकटा मंडळातील देमणी या गावी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे स्वतः उपस्थित होते. यावेळी त्यांनी नागरिकांनी शिबिरातील सेवांचा लाभ घ्यावा,असे आवाहन उपस्थितांना केले.






देमणी येथील कार्यक्रमास जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर आयुक्त खुलाशसिंग परदेशी, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, तहसिलदार शिवानंद बिडवे तसेच जिल्हा परिषद सदस्य ज्योती शिंदे, पंचायत समिती सदस्य पुष्पाबाई साळुंखे, गयाबाई ठोंबरे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने शिबिराची सुरुवात झाली. यावेळी जिल्हा माहिती कार्यालयामार्फत विविध योजनांची माहिती देणाऱ्या चित्ररथाचेही उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी उपस्थितांना समाधान शिबिरात मिळणाऱ्या विविध सुविधांची माहिती दिली. तसेच याशिबिरांच्या निमित्त आपले विविध दाखले, रेशनकार्ड, फेरफार नोंदी इ. विविध कामे गावातच करुन घ्यावीत,असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसिलदार शिवानंद बिडवे यांनी केले. सुत्रसंचालन ग्राम रोजगार सेवक सुभाष शेळके यांनी केले. शिबिरात विविध विभागाचे स्टॉल्स लावून नागरिकांना सेवा व योजनांची माहिती दिली जात होती. आरोग्य तपासणीसाठी सुद्धा स्टॉल लावण्यात आला होता.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा -१ जिल्ह्यात ८४ मंडळस्तरावर दि.७ ते १४ मार्च व एप्रिल महिन्यात १० ते १७ एप्रिल या कालावधीत तर नगरपालिकास्तरावर ८ ते १५ मे दरम्यान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार दि.७ मार्च रोजी जिल्ह्यात भावसिंगपूरा अपर तहसिल, शेकटा ता. छत्रपती संभाजीनगर, निजलगाव ता. पैठण, वडोदबाजार ता. फुलंब्री, वेरुळ ता. खुलताबाद, चिंचोली ता. कन्नड, शिवना ता. सिल्लोड, जरंडी ता. सोयगाव, तुर्काबाद ता. गंगापूर, खंडाळा ता. वैजापूर. येथे शिबिरांचे आयोजन करण्यात आले. सर्व ठिकाणी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**पुढील टप्प्यातील शिबिरांचे वेळापत्रक :-**

दि.१० मार्च रोजी आपेगाव ता. पैठण, नाचनवेल ता. कन्नड, गोळेगाव बु. त. सिल्लोड, शेंदूरवादा ता. गंगापूर, शिऊर ता. वैजापूर.

दि.१४ मार्च रोजी चौका ता. छत्रपती संभाजीनगर, ढोरकीन ता. पैठण, पिरबावडा ता. फुलंब्री, चापानेर ता. कन्नड, अजिंठा ता. सिल्लोड, बनोटी ता.सोयगाव, वाळूज ता. गंगापूर, गारज ता. वैजापूर.

दि.२४ मार्च रोजी करमाड ता. छत्रपती संभाजीनगर, पिंपळवाडी ता. पैठण, चिकलठाण ता. कन्नड, पालोद ता. सिल्लोड, आसेगाव ता. गंगापूर, लासूरगाव ता. वैजापूर.

दि.३० मार्च रोजी कचनेर ता. छत्रपती संभाजीनगर, नादर ता. पैठण, उंडणगाव ता. सिल्लोड, डोणगाव ता. गंगापूर, लोणी खु. वैजापूर.

दि.१० एप्रिल रोजी कांचनवाडी, अपर तहसिल, वरुड काजी ता. छत्रपती संभाजीनगर, बिडकीन ता. पैठण, आळंद ता. फुलंब्री, बाजारसावंगी ता. खुलताबाद, पिशोर ता. कन्नड, निल्लोड ता. सिल्लोड, सावळदबारा ता. सोयगाव, हर्सूल ता. गंगापूर, जानेफळ ता. वैजापूर.

दि.१७ एप्रिल रोजी पंढरपूर अपर तहसिल, चित्ते पिंपळगाव ता. छत्रपती संभाजीनगर, बालानगर ता. पैठण, बाबरा ता. फुलंब्री, सुलतानपूर ता. खुलताबाद, करंजखेडा ता. कन्नड, भराडी ता.सिल्लोड, सिद्धनाथ वडगाव ता. गंगापूर, महालगाव ता. वैजापूर.

दि.२३ एप्रिल रोजी लोहगाव ता. पैठण, देवगाव रंगारी ता. कन्नड, आमठाणा ता.सिल्लोड, गाजगाव ता.गंगापूर, बोरसर ता. वैजपुर.

दि.३० एप्रिल रोजी लाडसावंगी ता. छत्रपती संभाजीनगर, आडूळ ता. पैठण, हतनूर ता. कन्नड, अंभई ता. सिल्लोड, भेंडाळा ता. गंगापूर, नागमठाण ता.वैजापूर.

दि.५ मे रोजी पिसादेवी ता. छत्रपती संभाजीनगर, पाचोड ता. पैठण, नागद ता. कन्नड, बोरगाव बाजार ता. सिल्लोड, जामगाव ता. गंगापूर, बाबतारा ता. वैजापूर.

दि.८ मे रोजी छत्रपती संभाजीनगर, पैठण, फुलंब्री, खुलताबाद, कन्नड, सिल्लोड, सोयगाव, गंगापूर, वैजापूर.

दि.१५ मे रोजी उस्मानपुरा अपर तहसिल, चिकलठाणा ता. छत्रपती संभाजीनगर, विहामांडवा ता. पैठण, मांजरी ता. गंगापूर, घायगाव ता. वैजापूर.

# लायन्स क्लब एंजल व प्रियदर्शनी विद्यालय यांच्या वतीने महिला दिन उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- लायन्स क्लब ऑफ एंजल छत्रपती संभाजीनगर व मनपा प्रियदर्शनी विद्यालय यांच्या वतीने ०८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त परिसरातील उद्योजिका , समाजसेविका, व कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सोनम जी श्रीकांत यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी लायन्स अध्यक्ष नीतू भट, नगरसेविका अनिता मानकापे, ला.उपाध्यक्ष हर्षा गुणवाणी, सचिव रिता पूरवार, माजी अध्यक्ष रश्मी नायर व दिपाली घुगे . पुष्पा मोहन यांची उपस्थिती होती. प्रारंभी शाळेचे मुख्याध्यापक संजीव सोनार यांनी प्रास्ताविक केले. शाळेच्या सिम्फनी बँड ने जय जय महाराष्ट्र गीत गाऊन सर्वांची वाहवा मिळवली व विद्यार्थ्यांनी विविध गीते सादर केली.



सोनम श्रीकांत यांनी यावेळी मार्गदर्शन भाषणामध्ये महिला शिवाय पुरुषाला किंमत नाही. संसारामध्ये महिला व पुरुष यांचे समान स्थान आहे त्यामुळे आज अनेक क्षेत्रांमध्ये महिलांमुळे पुरुष व पुरुषांमुळे महिला हे चांगले काम करत आहे.

त्यांच्यामध्ये कुणालाही कमी लेखू नये. एकाच नाण्याच्या दोन्ही बाजू आहेत. सोनम जी श्रीकांत यांनी शाळेतील विविध उपक्रमांना भेटी देऊन मुख्याध्यापक व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. तसेच स्टेपिंग स्टोनच्या संचालिका इन्सिया रहीम यांनी प्रियदर्शनी विद्यालयाकडे माझे विशेष लक्ष राहील व मी वेळोवेळी मार्गदर्शन करेल याची खात्री शिक्षकांना दिली

याप्रसंगी डॉ. अरुणा कराड, स्टेपिंग स्टोन स्कूलच्या संचालिका इंसिया रहीम, विनी दक्षिनी, स्वाती गांधी, शिल्पा चुडीवाल,डॉ. कविता मंडलेचा प्राजक्ता विसपुते , वैशाली पांढरे, ज्योती भालेराव,प्रियंका सरनाईक, रुचिका जयस्वाल यांचा शाल पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली गुळवे यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तेजस्विनी देसले मनीषा नगरकर,मोनिका चव्हाण, काकासाहेब जाधव, यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा माहिती कार्यालयाच्या चित्ररथाचे उद्घाटन व हिरवी झेंडी दाखवून रवाना



छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयातर्फे जिल्ह्यात योजनांची माहिती देणारा चित्ररथाचे उद्घाटन आज करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा -१ ला आज जिल्ह्यात १० ठिकाणी प्रारंभ झाला.

याप्रसंगाचे औचित्य साधून देवणी येथील शिबिरात या रथाचे उद्घाटन करण्यात आले. जिल्हा परिषद सदस्य ज्योती शिंदे, पंचायत समिती सदस्य पुष्पाबाई साळुंखे, गयाबाई ठोंबरे तसेच जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, तहसिलदार शिवानंद बिडवे, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने व स्थानिक लोकप्रतिनिधी कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्ह्यातिल १६८ गावांमध्ये हा चित्ररथ जाऊन नागरिकांना सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती देणार आहे.

# भानुदास-एकनाथाच्या जयघोषात नाथांच्या वाड्यातील ऐतिहासिक रांजण पूर्ण भरला

पैठण दि.७ (प्रतिनिधी)- वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा असलेल्या पैठण नगरीत, नाथषष्ठी यात्रा सोहळ्याच्या मंगल पर्वावर एका भावपूर्ण परंपरेची सांगता झाली. साक्षात पांडुरंगाने श्रीखंड्याचे रूप घेऊन जिथे १२ वर्षे पाणी भरण्याची सेवा केली, तो श्रीसंत एकनाथ महाराज यांच्या वाड्यातील पवित्र रांजण आज, शनिवारी सकाळी भानुदास-एकनाथाच्या जयघोषात पूर्ण भरला आहे.



गुरुवार, ५ मार्च रोजी तुकाराम बीज मुहूर्तावर नाथवंशज रघुनाथबुवा गोसावी पालखीवाले आणि रावसाहेब महाराज गोसावी यांच्या हस्ते या रांजण पूजन सोहळ्याचा प्रारंभ झाला होता. गेल्या तीन दिवसांपासून हजारो भाविकांनी गोदावरीचे पवित्र जल या रांजणात अर्पण करण्यासाठी रांगा लावल्या होत्या. शनिवारी सकाळी ७:५० वाजता, संतोष विठ्ठलराव कुलकर्णी (रा. लिंबूर, जि. कामारेड्डी) या नाथभक्ताने पाण्याची घागर अर्पण केली आणि हा ऐतिहासिक रांजण काठोकाठ भरला.

असे मानले जाते की, संत एकनाथांच्या भक्तीला भुलून पांडुरंग श्रीखंड्या बनून त्यांच्या घरी पाणी भरत असत. याच स्मृतीला उजाळा देण्यासाठी दरवर्षी हा रांजण भरण्याचा उत्सव साजरा केला जातो. रांजण भरण्याचा मानकरी ठरल्याबद्दल संतोष कुलकर्णी यांचा नाथवंशज आणि संस्थानाधितींच्या हस्ते नाथा घरचा प्रसाद व नारळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी रघुनाथबुवा गोसावी, रावसाहेब महाराज गोसावी, श्रीकृष्ण कुलकर्णी, रवींद्र महाराज पांडव यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन स्थगित

कन्नड दि.७ (प्रतिनिधी)- तालुक्यातील विविध प्रलंबित प्रश्नांवरून सुरू असलेले शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन ३१ मार्चपर्यंत तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. संबंधित विभागांकडून लेखी आश्वासने मिळाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. तहसील कार्यालयासमोर सोमवारी (दि२) सकाळी संघर्ष समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. अण्णासाहेब शिंदे यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी आंदोलनास सुरुवात करण्यात आली होती. देवगाव (रं) येथील १० एम.व्ही.ए. क्षमतेचा डी.पी. १५ मार्चपर्यंत सुरू करण्यात येईल, असे महावितरण विभागाने लेखी पत्राद्वारे कळविले आहे. तसेच औराळा ३३ के.व्ही. केंद्रातील १० एम.व्ही.ए. डी.पी.चे काम सुरू करण्यात आले असून ते २८ मार्चपर्यंत कार्यान्वित करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# प्रत्येक काम मन लावून केल्यास यश हमखास-डॉ.निशिगंधा व्यवहारे

### स्व-संवाद, सातत्य आदीबाबत लिटिल एंन्जल इंग्लिश स्कुलमध्ये मार्गदर्शन

छत्रपती संभाजीनगर दि.७ (प्रतिनिधी)- आज प्रत्येक पालकांना आपल्या मुलांकडून यशाची अपेक्षा असते, ती स्वभाविक आहे. मात्र विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी आणि इतर छंद जोपसले पाहिजे. प्रत्येक काम मन लावून केल्यास यश हमखास मिळते, त्यासाठी सातत्य, प्रयत्न करण्याची गरज असल्याची प्रतिपादन डॉ. निशिगंधा व्यवहारे यांनी केले.



स्व- संवाद, सातत्य, स्वतःचा स्वीकार आदीबाबत निराला बाजार रोड, नागेश्वरवाडी येथील लिटिल एंन्जल इंग्लिश स्कुलमध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्या डॉ. योगिता शास्त्री, सर्व शिक्षक, कर्मचारी, पालक उपस्थित होते. याप्रसंगी बोलतांना डॉ. व्यवहारे म्हणाल्या की, आता परीक्षाचा काळ असून, या काळात विद्यार्थी तणावात राहतात, मात्र वर्षभर केलेली मेहनत वाया जात नाही. आपल्या अभ्यास शैलीला समजून अभ्यास केला तर अभ्यासाचा कंटाळा येणार नाही. अडचणी गुरुजण आणि पालकांना सांगायला शिका. प्रत्येक गोष्ट संवाद आणि समन्वयातून सोडवा. पुरेशी झोप आणि आहाराबरोबर आरोग्याची काळजी घ्यायला पाहिजे. टीव्ही, मोबाईल, कॉम्पुटर या गोष्टी कामापुरत्या वापरून अतिरेक टाळला पाहिजे, असा महत्वाचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

(पान १ वरून)

## आमचा तो हेतू नव्हता;...

आमचा कोणताही हेतू नव्हता. तथापि अमेरिका आणि इस्रायलसमोर शरणागती पत्करणार नाही, असेही पेझेश्कियान यांनी स्पष्ट केले आहे. ''इराणने बिनशर्त शरणागती पत्करावी, अशी इच्छा शत्रूंनी व्यक्त केली आहे. त्यांची इच्छा त्यांच्याबरोबरच त्यांच्या थडग्यात पुरली जाईल'', असेही पेझेश्कियान म्हणाले.

२८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने इराणची राजधानी तेहरानवर क्षेपणास्त्र डागले. त्यानंतर युद्धाला सुरुवात होताच इराणनेही प्रत्युत्तरादाखल शेजारच्या आखाती देशांतील अमेरिकेच्या हवाई आणि लष्करी तळांना लक्ष्य केले. दुबई, अबु धाबी आणि युएई सारख्या मोठ्या शहरांमध्ये क्षेपणास्त्र डागण्यात आली. तसेच कुवैत, ओमान, कतार आणि सौदी अरेबियालाही लक्ष्य करण्यात आले.

## युद्धाचा भडका, सर्वसामान्यांना...

एलपीजी हे प्रोपेन आणि ब्युटेनचे मिश्रण आहे. देशाच्या एकूण एलपीजी गरजांपैकी जवळजवळ दोन तृतीयांश गरजा आयातीद्वारे पूर्ण केल्या जातात, या पुरवठ्यापैकी अंदाजे ८५-९०% मध्य पूर्वे तून येतात. अशातच इराणनं होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतल्यानं जागतिक बाजारपेठेतील जवळजवळ सर्वच क्षेत्रापुढं नवी समस्या निर्माण झाली आहे. अशातच घरघुती गॅस सिलेंडरच्या किमती ६० रुपयांनी वाढल्यामुळे त्याचा थेट फटका सर्वसामान्यांच्या खिशाला बसणार आहे.

## जागतिक तणावात भारताने संवाद....

की, भारताने तटस्थ व जबाबदार भूमिका स्वीकारत जागतिक शांतता व संवाद वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही आवाहन त्यांनी केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताने जागतिक स्तरावर अनेक मुद्द्यांवर सकारात्मक भूमिका बजावली आहे. सध्याच्या जागतीक तणावाच्या संवेदनशील परिस्थितीत भारताची मानवतावादी व शांततेच्या मार्गाची भूमिका जगासाठी प्रेरणादायी ठरेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. मानवतेचे हित व निरपराध नागरिकांची सुरक्षा यासाठी भारताने शांततेच्या मार्गाने पुढे जावे असेही आवाहन पत्रात हजारे यांनी पंतप्रधानांना केले आहे.

ज्येष्ठ समाजसेवकांना हजारे यांनी देशातील भ्रष्टाचार, निवडणूक पद्धत, मतदानाचा अधिकार, माहिती अधिकार, लोकपाल विधेयक, दारूबंदी आदी सुधारणांसाठी वेळोवेळी लोकसहभागातून आंदोलने करून सरकारला कायद्यात बदल करणे भाग पाडलेले आहे. त्यासाठी गावपातळीपासून थेट दिल्लीपर्यंत आंदोलने केली आहेत. त्यांच्या आंदोलनामुळे महाराष्ट्रातील काही मंत्र्यांना राजीनामेही द्यावी लागले आहेत.

## विदर्भात उष्णतेची लाट येण्याची....

धोका वाढणे अशा समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे नागरिकांनी दैनंदिन कामकाज करताना विशेष खबरदारी घेणे आवश्यक असल्याचेही विभागाने स्पष्ट केले आहे.

उष्णतेच्या लाटेदरम्यान काही सोप्या उपाययोजना करणे महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले आहे. शक्य असल्यास दुपारी बारा ते तीन या वेळेत बाहेर जाणे टाळावे. शरीरातील पाण्याची कमतरता टाळण्यासाठी तहान नसली तरी नियमितपणे पाणी आणि इतर द्रवपदार्थ घ्यावेत. तसेच हलके, सैल आणि फिकट रंगाचे सूती कपडे वापरावेत. बाहेर जाताना टोपी, छत्री किंवा ओले कापड वापरून डोके झाकल्यास उष्णतेपासून संरक्षण मिळू शकते. मद्यपान तसेच चहा, कॉफी आणि गॅसयुक्त पेयांचे सेवन कमी करावे, कारण त्यामुळे शरीरातील पाण्याची कमतरता वाढू शकते.

याशिवाय लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घेण्याची गरज असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे. घरातील तसेच बाहेरील जनावरांना सावलीत ठेवावे आणि त्यांना पुरेसे स्वच्छ पाणी उपलब्ध करून द्यावे. उष्माघाताची लक्षणे जसे की डोकेदुखी, चक्कर येणे, मळमळ किंवा जास्त घाम येणे जाणवू लागल्यास त्वरित सावलीत विश्रांती घ्यावी आणि गरज भासल्यास वैद्यकीय मदत घ्यावी. नागरिकांनी सतर्क राहून हवामान विभागाच्या पुढील सूचनांकडे लक्ष देण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## प्रसिद्ध आयुर्वेदिक....

वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनामुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठी हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या कुटुंबातील सदस्यही वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित आहेत. त्यांचे पती डॉ. नीलेश जेजुरकर हे नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयात मनोविकारतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत. मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात काम करणाऱ्या डॉक्टरांच्या कुटुंबात अशी घटना घडल्यामुळे अनेकांना धक्का बसला आहे. दरम्यान, या घटनेमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. तपासाच्या अनुषंगाने विविध बाबींची चौकशी केली जात आहे. कुटुंबीय, शेजारी तसेच परिचितांकडून माहिती घेण्याचे कामही सुरू आहे. घटनेमागील नेमके कारण समजून घेण्यासाठी पोलिसांकडून सखोल तपास केला जात असल्याचे सांगितले जात आहे.

या घटनेमुळे नाशिक शहरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. वैद्यकीय क्षेत्रातील सहकारी, परिचित तसेच त्यांच्या रुग्णांकडून शोक व्यक्त केला जात आहे. अनेकांनी त्यांच्या सेवाभावी वृत्तीची आणि रुग्णांप्रती असलेल्या बांधिलकीची आठवण काढली. अचानक घडलेल्या या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रात शोकाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्या निधनाने मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.